७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक **संध्या**
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक
रविवार, दि. ०७ जून २०२६

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १६२ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

# माणसं पैशापेक्षा प्रेमानं जिंकता येतात

## देवेंद्र फडणवीसांचे सुप्रिया सुळेंना उत्तर, म्हणाले-निवडणूक प्रक्रियेत परिवर्तन व्हावे, कोणी विधेयक आणले तर पाठिंबाच

**मुंबई (दै. संध्या)**

राज्यातील विधान परिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. महाविकास आघाडीतील काही उमेदवारांनी शेवटच्या टप्प्यात निवडणुकीतून माघार घेतल्याने महायुतीला फायदा झाल्याचा आरोप विरोधकांकडून करण्यात आला आहे. याच मुद्द्यावरून खासदार सुप्रिया सुळे यांनी या निवडणुकांमध्ये मोठ्या प्रमाणात घोडेबाजार झाल्याचा दावा केला होता. तसेच अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी लोकसभेत विधेयक मांडण्याचा निर्धारही त्यांनी व्यक्त केला. त्यांच्या या आरोपांवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आता थेट प्रतिक्रिया देत राजकीय चर्चांना नवे वळण दिले आहे. नवी मुंबई येथे प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना देवेंद्र फडणवीस यांनी सुप्रिया सुळे यांच्या आरोपांना उत्तर



दिले. माणसं पैशांपेक्षा प्रेमानं जिंकता येतात, हे समजलं तर अशा प्रकारचं विधेयक आणण्याची गरजच पडणार नाही, असे ते म्हणाले. मात्र, निवडणूक प्रक्रियेत सुधारणा व्हायला हव्यात, या मताशी त्यांनी सहमती दर्शवली. या संदर्भात कोणी विधेयक आणत असेल तर त्याला आपला विरोध नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. निवडणूक व्यवस्थेत आवश्यक बदल झाले पाहिजेत, असे मत व्यक्त करत त्यांनी या विषयावर संतुलित भूमिका मांडली.

याचवेळी कोकण विधान परिषद मतदारसंघातील घडामोडींवरही फडणवीस यांनी भाष्य केले. ठाकरे गटाचे उमेदवार बाळ माने यांनी निवडणुकीतून माघार घेतल्यानंतर ते भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याची चर्चा सुरू आहे. यावर बोलताना फडणवीस म्हणाले की, बाळ माने पूर्वीपासूनच आमच्याशी संबंधित होते. भाजपमध्ये अंतिम निर्णय हा पक्षाध्यक्षांचा असतो. प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण जो निर्णय घेतील, तो आम्हाला मान्य असेल. मुख्यमंत्री म्हणून नव्हे तर पक्ष कार्यकर्ता म्हणूनही मी त्यांच्या निर्णयाचा आदर करेन, असे त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, सुप्रिया सुळे यांनीही भाजपवर जोरदार टीका करत आपली भूमिका कायम ठेवली आहे. अलीकडील अनेक निवडणुकांमध्ये घोडेबाजार होत असल्याचा आरोप त्यांनी केला. तसेच विरोधी पक्षांच्या उमेदवारांवर दबाव आणण्यासाठी तपास यंत्रणांचा वापर केला जात असल्याचेही त्या म्हणाल्या. महाविकास आघाडीला माघार आघाडी, म्हणून हिणवणाऱ्या भाजप नेत्यांवर निशाणा साधताना त्यांनी भाजपने मला तोंड उघडायला लावू नये, असा इशाराही दिला. आपण सुसंस्कृत असल्यामुळे अनेक गोष्टी बोलत नसल्याचे त्यांनी नमूद केले. आगामी लोकसभा आणि विधानसभा निवडणुका महाविकास आघाडी पूर्ण ताकदीने लढणार असल्याचे सुप्रिया सुळे यांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे येत्या काळात निवडणूक प्रक्रियेवरील चर्चा आणि राजकीय संघर्ष आणखी तीव्र होण्याची चिन्हे दिसत आहेत.

# दिल्लीत कॉकरोच जनता पार्टीचे ५ तास आंदोलन

**मुंबई (दै. संध्या)**

■ शिक्षण मंत्र्यांनी 5 दिवसांत राजीनामा द्यावा, अन्यथा येत्या शनिवारी पुन्हा आंदोलन : अभिजीत दिपके

'नीट' परीक्षेची प्रश्नपत्रिका फुटल्याच्या मुद्द्यावरून 'कॉकरोच जनता पार्टी'ने शनिवारी दिल्लीतील जंतर-मंतर येथे पाच तास आंदोलन केले. CJP चे संस्थापक अभिजित दीपके यांनी शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी पाच दिवसांच्या आत राजीनामा द्यावा, अशी मागणी केली; तसेच, तसे न केल्यास पुढील शनिवारी पुन्हा जंतर-मंतरवर आंदोलन करण्याचा इशाराही त्यांनी दिला. अभिजित सकाळीच अमेरिकेतून दिल्लीला परतले होते आणि विमानतळावरून थेट जंतर-मंतरवर पोहोचले होते. दिल्लीतील जंतरमंतर येथील आंदोलनाचे नेतृत्व अभिजित दीपके यांनी केले. या निदर्शनांमध्ये सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनीही सहभाग घेतला. तसेच, अभिजित यांच्यासोबत 'सीजेपी'चे (CJP) प्रवक्ते आशुतोष रांका हे देखील दिसून आले. आशुतोष हे आयआयटी कानपूरचे माजी विद्यार्थी असून, ते गेल्या वर्षीच लंडनहून भारतात परतले आहेत. 'कॉकरोच जनता पार्टी'च्या (CJP) आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर इंदिरा




गांधी विमानतळ, मुख्य रेल्वे स्थानक, बस स्थानके आणि दिल्लीच्या सीमावर्ती भागांत सुरक्षा व्यवस्था कडक करण्यात आली होती. विविध ठिकाणी १,००० हून अधिक पोलीस कर्मचारी तैनात करण्यात आले होते. तसेच, बाजारपेठा आणि संवेदनशील भागांत कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या.

# नीट पेपरफुटी प्रकरणी शहांनी राजीनामा दिला पाहिजे : संजय राऊत

**मुंबई (दै. संध्या)**

भाजप सांगतो म्हणून काही देशातील विरोधी पक्ष संपणार नाही. काही दिवसांनी लोकं सत्ताधाऱ्यांच्या मागे चपला घेऊन धावतील. त्यावेळी यांनाच वाटेल की जमीनीने आपल्याला सामावून घ्यावे, असे उबाठाचे खासदार संजय राऊत यांनी म्हटले आहे. तर इंडिआ आघाडीच्या बैठकीला सर्वच पक्षाचे नेते हजर राहणार आहेत, काही जण ऑनलाईन बैठकीला उपस्थित राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. संजय राऊत म्हणाले की, विधान परिषद बरखास्त करा असे सुधीर मुनगंटीवार यांना का वाटत आहे? या संदर्भात त्यांनी पत्रकार परिषद त्यांच्या पक्षाच्या नेत्यांसोबत घेतली पाहिजे. सुधीर मुनगंटीवार यांना असे वाटण्याचे कारण आहे, यामध्ये जो यांनी घोडेबाजार सुरू केला आहे. एका दिवसात ज्यांनी 150 कोटी रुपये खर्च केले त्यांच्याबद्दल मी बोलत आहे. या पैशाच्या माध्यमातून विधान परिषद, राज्यसभेच्या निवडणुका तुम्ही लढवत आहात म्हणून लोकांना निवडणूक नको आहे. राज्यसभेप्रमाणे विधान परिषद निवडणूक करा आणि मतपत्रिकेवर निवडणूक घ्या, अशी



मागणी मुनगंटीवार यांनी त्यांच्या पक्षाच्या नेत्यांकडे लावून धरली पाहिजे. संजय राऊत म्हणाले की, कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके हे जंतर-मंतरवर केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी आंदोलन करत आहे.

सरकारला त्यांची दखल घ्यावी लागेल. हे आंदोलन होऊ नये, युवकांनी तिथे पोहचू नये यासाठी सरकार दबावाचा प्रयत्न करत आहे. पोलिसांना गर्दी होऊ न देण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. दिपके यांचे आंदोलन हे अराजकीय आंदोलनाचा भाग आहे. सामाजिक संस्था, सामाजिक कार्यकर्ते हे त्यांच्यासोबत आंदोलनासाठी एकत्र येत आहेत.

# मान्सून महाराष्ट्रात दाखल

**पुणे (दै. संध्या) :** तमाम महाराष्ट्र वासीयांसाठी एक आनंदाची बातमी. ज्याची वाट आपण चातक चोचीने पाहत होता, तो मान्सून अखेर महाराष्ट्रात दाखल झालाय. गोवा, दक्षिण महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमध्ये विजांच्या कडकडाटासह वादळ, मुसळधार पाऊस आणि ताशी 40-50 किमी वेगाने वारे वाहण्याची शक्यता वर्तवण्यात आलीय. उत्तर कोकण, उत्तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ, हलका ते मध्यम पाऊस आणि ताशी 40-50 किमी वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे. उत्तर कोकणातील जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी उष्ण आणि दमट हवामान राहण्याची शक्यता आहे. देशभरात नैऋत्य मान्सूनची आगेकूच वेगाने सुरू आहे. केरळमध्ये दाखल झाल्यानंतर मान्सूनने गोव्यात प्रवेश केला. त्यानंतर त्याने आता तळ कोकणात प्रवेश करून महाराष्ट्रात हजेरी लावली आहे. भारतीय हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, येत्या काही तासांत मान्सून अजून पुढे आगेकूच करणार आहे. त्यामुळे कोकण, गोवा, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील अनेक भागांत पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.


# शिवराज्याभिषेक हाच भारताचा पहिला स्वातंत्र्यदिन

*रायगडावरून संभाजीराजेंची भावनिक साद, ३५२ व्या सोहळ्यात मानाचा मुजरा*

**पुणे (दै. संध्या)**

रायगडावर आज छत्रपती शिवाजी महाराजांच्या 352 व्या शिवराज्याभिषेक सोहळ्याचा उत्साहपूर्ण जल्लोष पाहायला मिळाला. देशाच्या कानाकोपऱ्यातून हजारो शिवप्रेमी आणि शिवभक्त रायगडावर दाखल झाल्याने संपूर्ण परिसर शिवमय झाला होता. महाराजांच्या जयघोषाने गड दुमदुमून गेला असून विविध सांस्कृतिक आणि ऐतिहासिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक 6 जून 1674 रोजी याच रायगडावर पार पडला होता. या ऐतिहासिक दिवसाची आठवण जपण्यासाठी दरवर्षी संभाजीराजे छत्रपती रायगडावर उपस्थित राहून शिवभक्तांना संबोधित करतात. यंदाही त्यांनी उपस्थितांना भावनिक शब्दांत संदेश दिला.

संभाजीराजे छत्रपती यांनी उपस्थितांच्या उत्साहाचे कौतुक केले. रायगडावर जमलेल्या जनसमुदायाचा उल्लेख करताना त्यांनी, हा केवळ जनसागर नाही, तर शिवसागर आहे, असे म्हटले. रायगडावर मर्यादित सुविधा असतानाही हजारो शिवभक्त अनेक दिवसांपासून मुक्काम करून या सोहळ्यासाठी उपस्थित



राहतात, याबद्दल त्यांनी विशेष गौरव केला. राहण्याची, जेवणाची आणि इतर सुविधांची कमतरता असूनही शिवभक्त मोठ्या श्रद्धेने रायगडावर येतात, हेच महाराजांविषयीचे प्रेम आणि निष्ठा दर्शवते, असे त्यांनी नमूद केले. संभाजीराजे पुढे म्हणाले की, गेल्या काही दिवसांपासून गडावर मुक्काम करणाऱ्या शिवभक्तांचे समर्पण पाहून ते स्वतःही भावूक झाले आहेत. रात्रीची व्यवस्था, दैनंदिन गरजा आणि अनेक अडचणी असूनही हजारो लोक फक्त छत्रपती शिवाजी महाराजांना वंदन करण्यासाठी येथे दाखल झाले आहेत. 300 वर्षांहून अधिक काळ लोटल्यानंतरही एखाद्या राजासाठी अशी भावना आणि श्रद्धा कायम राहणे ही अभिमानाची बाब असल्याचे त्यांनी सांगितले. आपण महाराजांचे रक्ताचे आणि विचारांचे वारसदार आहोतच, पण या शिवभक्तांनाही वंदन करण्यासाठी आपण येथे आलो असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

राज्याभिषेक सोहळ्याचे ऐतिहासिक महत्त्व अधोरेखित करताना संभाजीराजेंनी सांगितले की, हा दिवस केवळ एका राजाच्या राज्याभिषेकाचा नव्हता, तर स्वराज्याच्या नव्या पर्वाचा प्रारंभ होता. ज्या ठिकाणी आज मेघडंबरीत छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा आहे, त्याच ठिकाणी महाराजांना छत्रपती पदाचा मान मिळाला होता. अनेक सत्ताधीशांना आणि गुलामगिरीच्या जोखडाला आव्हान देत महाराजांनी स्वराज्याची स्थापना केली. त्यामुळे हा दिवस इतिहासातील अत्यंत महत्त्वाचा टप्पा ठरला. राज्याभिषेकानंतर महाराजांनी नव्या शकाची सुरुवात केली आणि स्वराज्याला स्वतंत्र ओळख दिली, याची आठवण त्यांनी करून दिली.

यावेळी संभाजीराजे छत्रपती यांनी एक महत्त्वपूर्ण विधान करत शिवराज्याभिषेक दिनाला भारताचा पहिला स्वातंत्र्यदिन म्हटले. 1947 मध्ये देशाला ब्रिटिश सत्तेतून स्वातंत्र्य मिळाले, हा दिवस निश्चितच ऐतिहासिक आहे. मात्र त्यापूर्वी छत्रपती शिवाजी महाराजांनी परकीय सत्तांविरोधात लढा देत स्वराज्य उभे केले आणि जनतेला स्वाभिमानाचा मार्ग दाखवला.

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
www.sandhyaepaper.com

### ढिंग-टांग




## राज ठाकरेंची सूचना, उबाठासह सुप्रिया सुळेंचाही पाठिंबा; दिल्लीत खलबते

# बॅलेट पेपर नाही, तर निवडणुकीवर बहिष्कार टाकावा



**विरोधकांच्या नव्या रणनीतीकडे लक्ष**

राज ठाकरे यांनी टाकलेली ही गुगली आता थेट दिल्ली इंडिया आघाडीच्या दरबारी पोहोचणार आहे. ईव्हीएमच्या विश्वासार्हतेवर आधीच प्रश्नचिन्ह उपस्थित करणाऱ्या देशपातळीवरील विरोधी पक्षांना आता 'निवडणूक बहिष्कारा'चा हा नवीन पर्याय कितपत मानवतो आणि आगामी काळातील सार्वत्रिक निवडणुकांमध्ये विरोधक हे अस्त्र खरोखरच बाहेर काढणार का? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

**मुंबई (दै. संध्या)**

राज्यात विधान परिषदेच्या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या निवडणुकीमुळे राजकीय वातावरण कमालीचे तापले असतानाच, आता 'ईव्हीएम' विरुद्ध 'बॅलेट पेपर' हा वाद पुन्हा एकदा उफाळून आला आहे. जोपर्यंत निवडणुका बॅलेट पेपरवर होत नाहीत, तोपर्यंत थेट निवडणुकीवरच बहिष्कार टाकण्याचा विचार मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मांडला असून, या भूमिकेला आता महाविकास आघाडीतूनही मोठे बळ मिळताना दिसत आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी या सूचनेचे स्वागत केले असून, हा मुद्दा थेट दिल्लीतील 'इंडिया' आघाडीच्या बैठकीत उपस्थित करणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी नुकतीच मनसे प्रमुख राज ठाकरे यांची भेट घेतली होती. या भेटीत राज्यातील राजकीय परिस्थितीसह महत्त्वाच्या विषयांवर चर्चा झाली. या भेटीनंतर संजय राऊत यांनी माध्यमांशी संवाद साधला. जोपर्यंत निवडणुका बॅलेट पेपरवर होत नाहीत, तोपर्यंत निवडणुकींवर बहिष्कार टाकला पाहिजे, असे मत राज ठाकरे यांनी व्यक्त केल्याचे संजय राऊत यांनी सांगितले. राज ठाकरे यांची हीच भूमिका राऊत यांनी उद्धव ठाकरे यांच्यापुढे मांडली. विशेष म्हणजे उद्धव ठाकरे यांचीदेखील याला मान्यता असल्याचे संजय राऊत म्हणालेत.

संजय राऊत आणि राज ठाकरे यांच्या भेटीत झालेल्या चर्चेबाबत माध्यम प्रतिनिधींनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांना प्रश्न विचारला असता, त्यांनी राज ठाकरे यांच्या भूमिकेचे कौतुक केले. "राज ठाकरे यांनी दिलेली ही सूचना नक्कीच चांगली आणि विचार करण्यासारखी आहे, असे त्या म्हणाल्या. येत्या ८ जून रोजी दिल्लीमध्ये 'इंडिया' आघाडीची महत्त्वाची बैठक होत आहे. या बैठकीत मी स्वतः हा मुद्दा राष्ट्रीय पातळीवरील सर्व नेत्यांसमोर प्रकर्षाने मांडणार असून, या बहिष्काराच्या भूमिकेवर सविस्तर चर्चा केली जाईल," असेही सुप्रिया सुळे यांनी सांगितले. दुसरीकडे, विधान परिषद निवडणुकीत महाविकास आघाडीच्या काही उमेदवारांनी ऐनवेळी अनपेक्षितपणे अर्ज मागे घेतल्याने अनेक जागांवर महायुतीचे उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. या नाट्यमय घडामोडींमुळे महाविकास आघाडीच्या नेत्यांनी सत्ताधाऱ्यांवर कडाडून टीका केली आहे. या निवडणुकीत प्रचंड मोठ्या प्रमाणावर 'घोडेबाजार' झाला असल्याचा थेट आरोप महाविकास आघाडीच्या नेत्यांकडून करण्यात आला आहे.

# वैभव सूर्यवंशी सर्वात तरुण क्रिकेटपटू

*१५ वर्षे, ७१ दिवसांच्या वयात निवड झाली; श्रेयस टी-२० चा नवा कर्णधार*

**मुंबई (दै. संध्या)**

वैभव सूर्यवंशी भारतीय क्रिकेट संघात निवडला गेलेला आतापर्यंतचा सर्वात तरुण खेळाडू बनला आहे. 15 वर्षे, 71 दिवसांच्या वैभवला जून-जुलैमध्ये आयर्लंड आणि इंग्लंडविरुद्धच्या टी-20 मालिकेसाठी तसेच सप्टेंबरमध्ये होणाऱ्या आशियाई खेळांसाठी निवडण्यात आले आहे. आशियाई खेळांमध्ये क्रिकेटचे सामने टी-20 फॉरमॅटमध्येच होतात.

श्रेयस अय्यर टी-20 फॉरमॅटमध्ये भारताचा नवीन कर्णधार बनला आहे. विश्वचषक जिंकणाऱ्या सूर्यकुमार यादवकडून कर्णधारपद काढून घेण्यात आले आहे. त्याला संघातूनही वगळण्यात आले आहे. तिलक वर्मा टी-20 संघाचा उपकर्णधार बनला आहे.

संघात पहिल्यांदा निवड झाल्याच्या दिवशी सर्वात कमी वयाच्या बाबतीत वैभवने शेफाली वर्माचा विक्रम मोडला आहे. यापूर्वी, पुरुष आणि महिला क्रिकेट दोन्ही मिळून भारतीय संघासाठी निवडली जाणारी शेफाली सर्वात तरुण खेळाडू होती. शेफालीची जेव्हा पहिल्यांदा निवड झाली, तेव्हा ती १५ वर्षे, २२० दिवसांची होती. तर, पुरुष क्रिकेटपटूंमध्ये हा विक्रम सचिन तेंडुलकरच्या नावावर होता. सचिनची १६ वर्षे, १९४ दिवसांच्या वयात



भारतीय संघात निवड झाली होती.

शेफालीने १५ वर्षे २३९ दिवसांच्या वयात भारतासाठी पहिला सामना खेळला होता. तर, सचिनने १६ वर्षे २०५ दिवसांच्या वयात भारतासाठी पदार्पण केले होते. वैभवला जर इंग्लंड-आयर्लंड दौरा किंवा आशियाई क्रीडा स्पर्धेत एकही सामना खेळण्याची संधी मिळाली, तर तो शेफाली आणि सचिन दोघांनाही मागे टाकून भारतासाठी खेळणारा सर्वात तरुण क्रिकेटपटू बनेल. आयर्लंड आणि इंग्लंड दौऱ्यासाठी भारतीय टी-२० संघ: श्रेयस अय्यर (कर्णधार), तिलक वर्मा (उपकर्णधार), वैभव सूर्यवंशी, अभिषेक शर्मा, संजू सॅमसन, ईशान किशन, शिवम दुबे, नितीश कुमार रेड्डी, अक्षर पटेल, वॉशिंग्टन सुंदर, रवी बिश्नोई, वरुण चक्रवर्ती, मोहम्मद सिराज, हर्षित राणा, अर्शदीप सिंग आणि प्रिन्स यादव.

आशियाई खेळांसाठी भारतीय टी-२० संघ : श्रेयस अय्यर (कर्णधार), तिलक वर्मा (उपकर्णधार), वैभव सूर्यवंशी, अभिषेक शर्मा, संजू सॅमसन, ईशान किशन, शिवम दुबे, नितीश कुमार रेड्डी, अक्षर पटेल, वॉशिंग्टन सुंदर, रवी बिश्नोई, वरुण चक्रवर्ती, जसप्रीत बुमराह, हर्षित राणा आणि अर्शदीप सिंग.

अफगाणिस्तानविरुद्धच्या वनडे मालिकेत विराट कोहलीच्या जागी यशस्वी जयस्वाल खेळणार आहे. मुख्य निवडकर्ता अजित आगरकर यांनी सांगितले की, जयस्वाल जखमी कोहलीची जागा घेईल. विराट कोहली हॅमस्ट्रिंग दुखापतीमुळे या मालिकेतून बाहेर पडला आहे.

# संपादकीय

## काचेच्या बंद भिंतीआड कुणीच कुणाशी का बोलत नाहीये?



एडवर्ड हॉपर या अमेरिकन चित्रकाराने १९४२ मध्ये रंगवलेले एका महानगरातले डायनर. मध्यरात्र उलटून गेली आहे. बाहेरचा रस्ता निर्मनुष्य. रुंद काचेच्या भिंतीमागे चार लोक, तीन ग्राहक एक वेटर. कुणी कुणाशी बोलत नाहीये. एकमेकांकडे बघतही नाहीयेत. पिवळ्या दिव्याच्या कृत्रिम, ऊब नसलेल्या प्रकाशात प्रत्येकाचे एकाकीपण स्वतंत्र अधोरेखित होत आहे. हे कोणतेही एक विशिष्ट डायनर नाही. ते कोणत्याही मोठ्या शहरातले असू शकते. डायनरला दार नाही. आपण बाहेरून आत पाहतो आहोत. आतल्या लोकांचा एकाकीपणा आपल्याला दिसत आहे, त्यांना तो कदाचित जाणवतही नाही. आपण आत त्यांच्या जागी असतो तर आपल्यालाही तो जाणवला नसता कदाचित अशी जाणीव आपल्याला अस्वस्थ करते. शहरी निशाचर आपण असतोच कधी ना कधी. काचेच्या कधी अल्याड, कधी पल्याड. महानगरातील एकाकीपण सर्वव्यापी आहे. शहरी समूहातल्या प्रत्येकाच्या आपापल्या एकटेपणाचे हे प्रातिनिधिक चित्रण. हॉपरला हेच दाखवायचे आहे. काचेची भिंत हे माणसांमधल्या अभेद्य एकटेपणाचे प्रतीक. हॉपरने चित्र रंगवले ते दिवस जागतिक महायुद्धाचे. माणसांच्या मनातली परस्परांबद्दलची असुरक्षितता, भीतीची सावली कदाचित नाइटहॉक वर दबा धरून आहे. काचेच्या आतली शांतता स्फोटानंतरची किंवा आधीची असू शकते. आतल्या कृत्रिम पिवळ्या उजेडाची अनैसर्गिकता अशावेळी जास्त खटकते. बाहेरचा गडद अंधार भकास वाटायला लागतो. हेमिन्ग्वेच्या एका लघुकथेवरून प्रेरणा घेऊन हॉपरने हे चित्र काढले, असेही म्हटले जाते. एडवर्ड हॉपर हा विसाव्या शतकातला महानगरीय चित्रकार. १८८२-१९६७ या काळात त्याने अशी अनेक शहरे, गर्दीत हरवलेली एकटी माणसे, स्त्रिया रंगवल्या आहेत. हॉटेलच्या रूममधल्या खिडकीतून रहदारीचा रस्ता न्याहाळणाऱ्या, रेस्टॉरंटमध्ये टेबलावर एकटीने कॉफी पिणाऱ्या, ऑफिसात रात्री उशिरा काम करणाऱ्या एकेकट्या स्त्रिया. महानगरीय माणसांच्या समूहातले एकाकीपण चित्रित करणारी हॉपरची वास्तववादी चित्रे अमेरिकन आर्टचा चेहरा मानली जातात. हॉपरला खरंतर माणसे नाही, माणसांमधले अंतर रंगवायचे आहे. माणसे ज्या जागेत उभी अथवा बसलेली असतात, त्या जागांशी त्यांचे जोडलेले नसणे, कोरड्या अलिप्ततेचे थंड नाते तो रंगवतो. शारीरिक जवळीक असते, पण मानसिक अंतर अमर्याद. त्याची चित्रशैलीही तटस्थ, आशयाशी सुसंगत कट-ऑफ फ्रेम, प्रकाश-छायेमधला कठोर विरोधाभास डोळ्यात भरतो. त्याच्या चित्रात माणूस लहान, सावल्या लांब आणि आजूबाजूचा रिकामा अवकाश प्रचंड मोठा, अंगावर येणारा. खिडक्या, दारे, काचा हे सगळे सीमा अधोरेखित करणारे. रंगछटाही म्यूटेड, चेहरे अस्पष्ट. त्यातून भावनिक अलिप्तता जाणवते. शिकागो आर्ट इन्स्टिट्यूटमध्ये हे चित्र - नाईटहॉक लावलेले आहे. ८३ वर्षं झाली तरी ते अजिबात जुने वाटत नाही. संपूर्ण जग कोलाहलाने गजबजलेले एक मोठे शहर बनलेले असताना माणसांमधले अंतर जास्त ओसाड, एकटेपणा जास्त तीव्र झाला आहे. चित्रातली समकालिनता कालातीत आहे. आजूबाजूचे जग बदलले, डायनर बदलले. पण काचेची भिंत तशीच आहे. आता मोबाईलच्या स्क्रीनच्या काचेने तिची जागा घेतली आहे. एकाकीपणा बाहेरून पाहणाऱ्यालाच अस्वस्थ करतो फक्त, आतल्या माणसांकरिता तो सुखावहही असू शकतो ही जाणीव आता नव्याने अस्वस्थ करते.

## संस्कृत सुभाषित

धन्यानामुत्तमं दाक्ष्यं, धनानामुत्तमं श्रुतम्। लाभानां श्रेष्ठमारोग्यं, सुखानां तुष्टिरुत्तमा।।

अर्थ – फायदेशीर गुण कोणते? सर्वोत्तम संपत्ती म्हणजे विद्या, श्रेष्ठ लाभ म्हणजे आरोग्य आणि सुखामध्ये संतोष हा श्रेष्ठ होय.

## गुरु वचन

### आई–वडिलांना विसरू नका

खूप छान गोष्ट आहे. मुलगा आणि वडिलांच्या नात्याची. हल्ली आई–बाप मुलांना जड झाले आहेत. त्यांना वृद्धाश्रमात धाडले जात आहे. यावरच ही कथा आहे.

एकदा एक वयोवृद्ध बाप आपल्या उच्च शिक्षित मुलासोबत घराच्या छतावरती बसला होता. तेथे एक कावळा आला. मुलाला बापाने विचारले, ते काय आहे? मुलगा म्हणाला कावळा. पुन्हा दुसऱ्यांदा बापाने विचारले, ते काय आहे? मुलाने पुन्हा उत्तर दिले कावळा.

तिसऱ्यांदाही बापाने विचारले ते काय आहे? मुलाने जरासे दात–ओठ खात म्हटले, कावळा. मग ते दोघे घरात गेले. त्याला पुन्हा बापाने विचारले ते आत्ता आले होते ते काय होते? मुलाचा संयम सुटला होता त्याने ओरडत सांगितले, समजत नाही का? कावळा...... कावळा... कावळा.

पाचव्यांदा बापाने विचारले ते आपण पाहिले ते काय होते? मुलगा आता मात्र जाम भडकला त्याने त्यांना सांगितले, का टाईम पास करताय? तुम्हाला कितीदा सांगितले तो कावळा होता म्हणून, तरी तुम्हाला समजत नाही का? का जाणून– बुजून त्रास देताय?

मग त्या वयोवृद्ध बापाने त्या मुलाला घरातील एक डायरी आणायला सांगितली. त्याने ती आणली, त्यात हीच कथा लिहिली होती.

परंतु, ती थोडी वेगळी होती. त्या बापाच्या जागी एक लहान मुलगा होता. त्याने बापाला एक–दोन नाही तर तब्बल २५ वेळा हाच प्रश्न केला होता, आणि तितक्याच वेळा त्याच्या वडिलांनी त्याच्या प्रश्नाला हसत हसत उत्तर दिले.

त्यांना त्याच्या विचारण्याचा मुळीच राग येत नव्हता, उलट त्यांना त्या मुलाचा निरागस स्वभाव आणि त्याचे ते विचारणे आवडत होते. तो बाप त्या मुलाचाच होता जो त्याला केवळ पाच वेळा विचारल्यावर त्यांच्यावर खेकसला.

फरक फक्त हाच, की मुलासाठी बापाने केलेले कष्ट, त्यांनी सहन केलेल्या सर्व वेदना तो विसरला होता. उलट त्याने वडिलांना केवळ दु:खच दिले. लक्षात ठेवा. तुमच्या आई–वडिलांनी तुमच्यासाठी कितीतरी कष्ट केले आहेत आणि तुम्ही त्यांच्यासाठी केवळ दु:खच देत आहात? आई–वडिलांना विसरू नका. त्यांनी केलेल्या कष्टांना विसरू नका.

## उपदेशकथा

### ईश्वर भावाचा भुकेला

सत्यभामा श्रीकृष्णाची लाडकी पत्नी होती. एकदा तिने श्रीकृष्णाची सुवर्णतुला करण्याचे मनात आणले. तुलेसाठी श्रीकृष्ण तराजूच्या एका पारड्यात जाऊन बसला. दुसऱ्या पारड्यात सत्यभामेने आपले सोन्याचे सगळे दागिने घातले. पण श्रीकृष्णाचे पारडे जागचे हालेना. ते वर उचलले जाईना. आता काय करावे हे तिला सुचेना. तेव्हा तिने रुक्मिणीची विनवणी केली. रुक्मिणीने प्रथम मनापासून श्रीकृष्णाची प्रार्थना केली. नंतर अत्यंत प्रेमाने एक तुळशीदल त्या दागिन्यांवर ठेवले. त्याबरोबर श्रीकृष्णाचे पारडे वर उचलले. सत्यभामा काय समजायचे ते समजून गेली. भाव म्हणजे ईश्वराच्या आस्तित्त्वाबद्दल असीम श्रद्धा, देवा तूच एक आहेस, तुझ्यावाचून काही नाहीच' अशी दृढ श्रद्धा असते.

कथा उपदेश : ईश्वरावरील श्रद्धेला दृश्याचे नियम लागू नाहीत. जीवनाने बाह्यात कितीही बदलू दे. माणसाच्या अंतरंगातील भाव पूर्ववत राहू शकते.

## पंचांग

| | |
|---|---|
| रविवार | नक्षत्र:धनिष्ठा ०७:५५:२३ |
| विक्रम संवत्– २०८२ | योग:वैधृति १०:०१:१९ |
| अधिक ज्येष्ठशके | करण:विष्टि १५:०८:२० |
| संवत्– १९४८ | करण:बव २७:२४:५२+ |
| संवत्सर –पराभवनाम | सूर्य:वृषभ |
| अयन– उत्तरायणारंभ | चन्द्र:कुम्भ |
| मास–अधिक ज्येष्ठ | हिजरी सन् – १४४७ |
| ऋतु– सौर ग्रीष्म | मुस्लिम मास – जिल्हेज |
| कृष्ण पक्ष | तारीख – २१ |
| तिथि:सप्तमी २७:२४:५२+ | भानुसप्तमी |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ९७१

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | | | | 4 | | | | 9 |
| | | 1 | 6 | | 9 | | | |
| 5 | 9 | 2 | | | | | 3 | |
| 1 | | 4 | 9 | 3 | | | 7 | 5 |
| | 5 | | | 7 | | | 4 | |
| 2 | 3 | | | 6 | 4 | 8 | | 1 |
| | 8 | | | | | 5 | 6 | 2 |
| | | | 8 | | 7 | 4 | | |
| 4 | | | | 5 | | | | 7 |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. ९७० चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | 6 | 5 | 8 | 3 | 1 | 4 | 2 | 9 |
| 3 | 4 | 8 | 2 | 9 | 5 | 6 | 1 | 7 |
| 9 | 1 | 2 | 6 | 4 | 7 | 8 | 3 | 5 |
| 2 | 3 | 6 | 4 | 5 | 8 | 7 | 9 | 1 |
| 5 | 7 | 1 | 3 | 6 | 9 | 2 | 4 | 8 |
| 8 | 9 | 4 | 7 | 1 | 2 | 5 | 6 | 3 |
| 6 | 5 | 9 | 1 | 7 | 4 | 3 | 8 | 2 |
| 1 | 8 | 3 | 5 | 2 | 6 | 9 | 7 | 4 |
| 4 | 2 | 7 | 9 | 8 | 3 | 1 | 5 | 6 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १०९९ – पहिली क्रुसेड – जेरुसलेमचा वेढा सुरू.
- १८३२ – कॅनडात आलेल्या आयरिश नागरिकांच्या द्वारे कॉलेराचा प्रादुर्भाव सुरू झाला. ६,००० ठार.
- १८६२ – अमेरिका व युनायटेड किंग्डमने गुलामांच्या व्यापार बंद करण्याचा निर्णय घेतला.

### राष्ट्रीय

- २००४ – शिरोमणी अकाली दल (लाँगोवाल) या राजकीय पक्षाची स्थापना.
- २००४ – बेस्ट बेकरीप्रकरणाची सुरुवात मुंबईत सत्र न्यायालयात सुरू झाली.

### जन्म

- १७६१ – जॉन रेनी, स्कॉटिश अभियंतेचा जन्म.
- १८३७ – अलोइस हिटलर, एडॉल्फ हिटलरचे वडीलाचा जन्म.

### निधन

- १३२९ – रॉबर्ट द ब्रुस, स्कॉटलंडचा राजा याचे निधन.
- १३५८ – अशिकागा तकाउजी, जपानी शोगनचे निधन.
- १८२१ – ट्युडोर व्लादिमिरेस्कु, रोमेनियाचा क्रांतीकारीचे निधन.
- १८४० – फ्रेडेरिक विल्यम तिसरा, प्रशियाचा राजाचे निधन.
- १९५४ – ऍलन ट्युरिंग ब्रिटीश गणितज्ञ व संगणकशास्त्रज्ञाचे निधन.
- १९७८ – रोनाल्ड जॉर्ज व्रेफोर्ड नॉरिश, ब्रिटिश रसायनशास्त्रज्ञ व नोबेल पारितोषिक विजेताचे निधन.
- १९९२ – डॉ. स. ग. मालशे, मराठी वाङ्मयाचे अभ्यासक आणि संशोधकाचे निधन.
- १९९८ – शशिकांत नार्वेकर, गोमंतक मराठी अकादमीचे अध्यक्षचे निधन.
- २००२ – बी. डी. जत्ती, भारतीय उपराष्ट्रपतीचे निधन.

## : SMS :

Ek Larki India ka Match dekh rahi thi, us ke gaal pe India ka Flag bana hua tha. Ek larka aaya aur uske gaal pe kiss kar di aur kaha: I Love India.

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३९.३ | ३०.६ |
| अहमदनगर | ३८.८ | २५.६ |
| अकोला | ४३.९ | ३१.७ |
| अमरावती | ४२.१ | ३१.१ |
| बीड | ४४.८ | ३०.९ |
| भंडारा | ४३.५ | ३०.६ |
| बुलढाणा | ३८.९ | २९.८ |
| चंद्रपूर | ४४.५ | ३१.४ |
| चेन्नई | ४५.२ | ३२.७ |
| नवी दिल्ली | ३८.६ | ३०.१ |
| धुळे | ४३ | २९.७ |
| गोंदिया | ४२.१ | ३१ |
| जळगाव | ४३.८ | ३१.९ |
| कोल्हापूर | ३६.४ | २३.४ |
| लातूर | ३९.२ | २७.१ |
| मुंबई | ४१.७ | ३६.६ |
| नागपूर | ४२.५ | २९.१ |
| नांदेड | ४३.४ | २९.५ |
| नंदूरबार | ४०.४ | २९.५ |
| नाशिक | ३९.४ | २५.८ |
| पुणे | ३६.३ | २४.६ |
| पंढरपूर | ४१.२ | २८.८ |
| सातारा | ३८.७ | २२.९ |
| सांगली | ३८.२ | २४.२ |
| सोलापूर | ४०.८ | २८.४ |
| वर्धा | ४४ | ३१.६ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग : लाल, अनुकूल दिशा : पश्चिम आपल्या पराक्रमीवृत्तीमुळे आपल्याकडे येणाऱ्या लोकांचा ओढा जास्त राहील.

**वृषभ :** शुभ रंग:पांढरा,शुभ दिशा:पश्चिम स्वत:च्या विवेकाने निर्णय घेऊन कामे केल्यास यश मिळू शकेल.

**मिथुन :** शुभ रंग : पिवळा, अनुकूल दिशा : पूर्व व्यापारिक जबाबदारी, देणे:घेणे सीमित ठेवा. सुखद प्रवासाचे योग येतील.

**कर्क :** शुभ रंग : हिरवा, अनुकूल दिशा : पूर्व अनिश्चितता राहील. सर्व कामे मनासारखी होतील. वैयक्तीक जीवनात सावध रहा.

**सिंह :** शुभ रंग : काळा, अनुकूल दिशा : पश्चिम मुलांकडून थोडा त्रास होईल, परंतू प्रयत्न केल्यास समस्या सुटू शकते.

**कन्या :** शुभ रंग:लाल, शुभ दिशा:पुर्व कार्य क्षमतेमध्ये वाढ होईल. धार्मिकतेकडे मन झुकेल. अपूर्ण राहिलेले काम वेळेत पूर्ण होण्याचे योग आहेत.

**तुळ :** शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:पश्चिम उतावीळपणामुळे नुकसान होण्याची शक्यता.

**वृश्चिक :** शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा:पुर्व मतभेद, वादांना टाळण्याचा प्रयत्न करा. आर्थिक स्थिती चिंताजनक राहिल.


**धनु :** शुभ रंग:पांढरा, शुभ दिशा:उत्तर आत्मविश्वास कमी झाल्यामुळे मन लागणार नाही. व्यापार व्यवसाय मध्यम राहील. अडचणीवर मात कराल.

**मकर :** शुभ रंग:लाल, शुभ दिशा:पूर्व पूर्वी केलेल्या चांगल्या कामाचे फळ आता मिळेल. जोडीदाराशी संबंधात प्रगाढता येईल.

**कुंभ :** शुभ रंग : पांढरा, अनुकूल दिशा : पश्चिम आत्मविश्वास वाढीस लागेल. कामात तसेच व्यवसायात मनासारखे यश मिळेल.

**मीन :** शुभ रंग : काळा, अनुकूल दिशा : दक्षिण सामाजिक प्रतिष्ठा वाढेल. विचार पूर्वक निर्णय घेतल्याने फायदा होईल. वाईट सवयीपासून दूर रहा.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ९७१



### आडवे शब्द

१. शासन – पण शिक्षा नव्हे!
४. तोरा, ऐट
५. अवस्था, गेलेला
७. लुच्चा, लबाड
८. ओढणी
९. शीण
११. नाउमेद करणे
१२. वचक
१४. किरकोळ दुरुस्ती
१५. अश्व
१७. आर्द्रता
१९. श्रीरामाचा पुत्र
२१. पराभव
२२. मोठी सुई
२४. मलई
२७. रखवाली
२८. समशेर
३०. अगदी आवडलेले
३२. विहिरीतून पाणी शेंदण्याचे साधन
३४. एकाग्र नजर
३५. प्रसूती सहाय्यक
३६. मुरलीधरनचा गाजलेला चेंडू
३७. चिन्ह, संकेत
३९. फुगीर, गरगरीत गोल
४१. हळू
४४. मागणारा
४६. धोका
४७. आप्त
५०. आश्रय
५१. पुरीसारखे फुगणारे
५२. टपाल
५३. पूर्वी मध्यपूर्व आशियातील प्रदेश या नावाने ओळखला जाई
५४. कर्जदार
५६. अननुभवी
५८. वायू
६०. अंग पुसण्याचे मऊ वस्त्र
६१. बाज, खाट
६२. दृष्टी
६३. पोळीचा कुरकुरीत गुजराथी अवतार
६४. धागा
६५. सागर
६६. विडा रंगवणारा एक घटक

### उभे शब्द

१. बेचव
२. हाताचा प्रहार
३. पुराणकालीन घोडागाडी
४. नुकताच आलेला
५. ढाबळ
६. धीर, बळ, उत्साह
७. आफ्रिकेत पाण्यात आढळणारा अवाढव्य प्राणी
८. बालकाला प्रथम येणारे दात
१०. सुळका
११. ओशाळलेला
१३. पाषाण
१६. डाव्या हाताने काम करणारा
१७. कंबरेत वाकलेला
१८. तुळईला आधार देणारा खांब
२०. मिरवणूक
२१. वाटसरूंसाठी केलेली पिण्याच्या पाण्याची सोय
२३. चुकीचे, अभिप्रेत नसलेले
२५. भाऊबीजेची तिथी
२६. झोपडी
२९. राख
३१. अरिष्ट
३३. मारुती
३५. मोठा चाकू
३८. केस
४०. भाकरीला हद्दपार करून जेवणात आलेला गव्हाचा पदार्थ
४२. खळगा
४३. जमीन
४५. द.म. मिरासदार–शंकर पाटील वगैरेंनी लोकप्रिय केलेला एकपात्री कलाविष्कार
४६. किल्ल्यात किंवा हवेलीत असलेली गुप्त चर्चेची जागा
४७. घोड्यांच्या पायाला ठोकलेला पत्रा
४८. मालगाडीचा डबा
४९. मेहनत
५१. सुखद थंडावा
५२. पेच, खेळी
५३अ. दसऱ्याआधीचे सलग जागरण
५४. वेदातील ोक, मुलींचे एक नाव
५५. कोनाडा
५६. रोकड
५७. रात्र
६०. संप्रदाय, विशिष्ट विचारधारा

उत्तर उद्याच्या अंकात

### जम्बो शब्दकोडे क्र. ९७० चे उत्तर

आडवे उत्तर : १.आभार ३.हिरा मोती माणिक पाचू १०.यजमान १२.रन १३.कवायत १५.नवल १७.धमक १८.आदि १९.यशस्वी २१.रीतभात २३.उपवन २४.रकाना २५.पातळ २६.गायक २८.उदर २९.तप ३०.जम ३१.डर ३३.मामा ३४.माया ३६.कातकरी ३७.डहाळी ३९.सहकारी ४१.गरळ ४२.अंतर ४४.सर ४५.वेगवान ४७.गरा ४८.उहापोह ४९.सडपातळ ५१.समा ५२.रक्षक ५४.लव ५५.सहज ५६.अंतराळयान ५९.मालक ६१.कारभार ६२.तनया ६४.लाथ ६६.रसरशीत ६९.वाचनीय ७१.टवटवीत ७३.सतलज ७५.कर ७६.कचरा ७७.टर ७८.मनन ७९.दवणा ८०.तपकीर

उभे उत्तर : १.आसन २.रयनदिवस ३.हिमालय ४.रान ५.तीर ६.मानधन ७.करकरीत ८.चूक ९.खतरनाक ११.जव १४.वाजतगाजत १६.अस्वीकार १८.आप २०.शरद २२.तळवा २३.उजेड २५.पाप २७.यमक २८.उमा २९.तयारी ३२.रडराऊत ३३.माळी ३४.माका ३५.नगरपाल ३६.काळवेळ ३८.हार ४०.हर हर ४२.अंग ४३.महामाया ४४.सड ४६.वार्ताहर ४८.उसळ ४९.सकल ५०.तवका ५३.क्षमायाचक ५५.सभाधीट ५६.अंतरपाट ५७.रामरस ५८.नत ६०.कलाय ६३.नवा ६५.मतदार ६७.शीत ६८.तलम ७०.नीरद ७१.टच ७२.वरात ७४.जन ७६.कणा

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### 24 तास सुरु राहणार दुकाने व आस्थापने; महेश गुप्ता यांच्या पाठपुराव्याला मोठे यश

पुणे (दैनिक संध्या) : भारतीय जनता पार्टी व्यापारी आघाडी - पुणे शहरचे अध्यक्ष महेश गुप्ता यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला मोठे यश मिळाले असून, पुणे शहरातील व्यापारी वर्गाच्या विविध प्रश्नांबाबत महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आहेत. यामुळे व्यापाऱ्यांमध्ये निर्माण झालेला संभ्रम दूर होण्यास मदत होणार आहे. यासंदर्भात पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्या अध्यक्षतेखाली व्यापारी संघटनांची विशेष समन्वय बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला सह पोलीस आयुक्त संजय दराडे, अपर पोलीस आयुक्त तेजस्वी सातपुते, महेश गुप्ता तसेच विविध व्यापारी संघटनांचे पदाधिकारी आणि प्रतिनिधी उपस्थित होते. बैठकीत दुकाने व आस्थापनांच्या वेळांबाबत निर्माण झालेला संभ्रम, शहरातील विविध भागांमध्ये नियमांची होत असलेली वेगवेगळी अंमलबजावणी, व्यापाऱ्यांशी सन्मानपूर्वक वर्तन तसेच व्यापारी आणि पोलिस प्रशासन यांच्यातील समन्वय वाढविण्याच्या विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी स्पष्ट केले की, सर्व अधिकृत व परवानाधारक दुकाने आणि आस्थापने यांना कायद्यानुसार २४ तास व्यवसाय सुरू ठेवण्याची परवानगी आहे. तसेच टपऱ्या, हातगाडी व्यावसायिक, फेरीवाले, पानटपऱ्या आणि तत्सम व्यवसायांना रात्री १० वाजेपर्यंत व्यवसाय करण्यास परवानगी असल्याचे त्यांनी सांगितले. या स्पष्टीकरणामुळे व्यापारी वर्गातील संभ्रम दूर झाला असून, नियमांबाबत अधिक स्पष्टता निर्माण झाली आहे. याशिवाय व्यापाऱ्यांच्या तक्रारी, सूचना आणि समस्यांचे जलद निवारण व्हावे यासाठी स्वतंत्र नोडल ऑफिसर नियुक्त करण्याचा निर्णय घेण्यात आला. यामुळे व्यापारी आणि पोलिस प्रशासन यांच्यात थेट संवादाची प्रभावी यंत्रणा निर्माण होणार असून, व्यापाऱ्यांच्या प्रश्नांचे निराकरण अधिक वेगाने होण्यास मदत होणार आहे. व्यापारी वर्गासाठी स्वतंत्र नोडल ऑफिसर नियुक्त करण्याची मागणी आणि त्यासाठी सातत्याने पाठपुरावा करण्यामध्ये महेश गुप्ता यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यामुळे व्यापारी संघटनांनी या निर्णयाचे स्वागत करत पोलीस प्रशासनाचे आभार मानले. या बैठकीमुळे पुणे शहरातील व्यापारी वर्ग आणि पोलिस प्रशासन यांच्यातील समन्वय अधिक मजबूत होऊन व्यापारी हिताच्या प्रश्नांना गती मिळेल, असा विश्वास महेश गुप्ता यांनी व्यक्त केला.

### आषाढी एकादशीनिमित्त पुण्यातून धावणार 350 जादा 'लालपरी' बस

पुणे : यंदा भाविकांची गर्दी लक्षात घेता आषाढी एकादशीच्या निमित्ताने पंढरपूरला जाणाऱ्या वारकरी आणि भाविकांसाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) पुणे विभागाच्या वतीने तब्बल ३५० जादा लालपरी बस सोडण्यात येणार आहेत. पुणे विभागातून दरवर्षी आषाढी एकादशीला विठ्ठलाच्या दर्शनासाठी महाराष्ट्राच्या कोनाकोपऱ्यातून लाखो भाविक पंढरपूरकडे रवाना होतात. या काळात प्रवाशांची गैरसोय होऊ नये आणि त्यांचा प्रवास सुखकर व्हावा, यासाठी एसटी प्रशासनाने हे नियोजन सुरू असल्याचे पुणे एसटी विभागाच्या सहाय्यक वाहतूक अधीक्षक आयना शेख यांनी सांगितले. पुणे जिल्ह्यातील शिवाजीनगर (वाकडेवाडी), स्वारगेट, पिंपरी-चिंचवड, बारामती, इंदापूर, आणि शिरूर यांसारख्या प्रमुख आगारांतून आणि बसस्थानकांवरून या जादा गाड्या सोडण्यात येणार आहेत. 'एसटी आपल्या दारी'या उपक्रमाअंतर्गत एखाद्या गावातून किंवा सोसायटीतून वारकऱ्यांचा मोठा गट एकत्र जाणार असेल, तर त्यांना थेट त्यांच्या भागातूनच बस उपलब्ध करून देण्याची सोयही करण्यात आली आहे. शासनाच्या नियमांनुसार महिलांना तिकीट दरात ५०% सवलत आणि ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवासाची सवलत या जादा बसेसमध्येही लागू असणार आहे.

### न्यायालयात शिस्त राखण्यासाठी विधि आणि न्याय कट्टा

पुणे : न्यायालयीन कामकाजात व्यावसायिक शिस्त राखणे, वकील आणि पक्षकार यांच्यातील वाद सामोपचाराने मिटवणे आणि वकिली व्यवसायाची प्रतिष्ठा जपणे या उद्देशाने शिवाजीनगर न्यायालयात 'विधि आणि न्याय कट्टा' हा एक अभिनव उपक्रम सुरू केला आहे. अवघ्या तीन ते चार महिन्यांपूर्वी स्थापन झालेल्या या कट्ट्याने आतापर्यंत १७हून अधिक प्रकरणांमध्ये यशस्वी तडजोड घडवून आणली आहे, अशी माहिती या कट्ट्याचे संस्थापक अध्यक्ष, ज्येष्ठ विधिज्ञ व पुणे बार असोसिएशनचे माजी अध्यक्ष ॲड. एन. डी. पाटील यांनी दिली. पुणे बार असोसिएशनला पूरक आणि समांतर स्वरूपात काम करणाऱ्या या कट्ट्याची स्थापना न्यायालयात सुसंवाद आणि आदरयुक्त वातावरण निर्माण करण्यासाठी केली असल्याचे सांगून ते म्हणाले, न्यायालयात येणारे पक्षकार, आरोपी आणि वकील यांच्यात कोणताही अनुचित वाद किंवा गैरसमज होऊ नये यासाठी हा कट्टा प्रयत्नशील आहे. जर एखाद्या पक्षकाराची वकिलाविरोधात तक्रार असेल (उदा. फी घेऊन काम न करणे किंवा अपूर्ण काम करणे), तर कट्टातर्फे दोन्ही बाजूंना बोलावून घेण्यात येते आणि समजूतदारपणे वाद मिटविला जातो. यामध्ये कामाच्या प्रमाणात योग्य फी ठेवून उर्वरित रक्कम पक्षकाराला सन्मानपूर्वक परत मिळवून देण्याचे काम केले जाते. तसेच वकिलांवर कोणताही अन्याय होऊ नये, तसेच वकिलांकडूनही पक्षकारांवर अन्याय होणार नाही, याची काळजी कट्टातर्फे घेतली जाते. याशिवाय न्यायाधीश आणि वकील यांच्यातील संबंध सुधारणे आणि न्यायालयाची प्रतिष्ठा राखणे याला प्राधान्य दिले जाते. 'विधि आणि न्याय कट्टा'च्या अध्यक्षस्थानी चार ज्येष्ठ व अनुभवी विधिज्ञ कार्यरत आहेत. त्यात ॲड. एन. डी. पाटील (संस्थापक अध्यक्ष) ॲड. एल. एस. गाडगे पाटील, ॲड. बिपीन पाटोळे, ॲड. गोरक्षनाथ काळे यांचा समावेश असून, या कट्ट्यामध्ये सध्या सुमारे ४५ हून अधिक तरुण, उत्साही आणि धडाडीचे वकील सक्रिय सदस्य आहेत. हे सर्व सदस्य न्यायालयात शिस्त राखण्यासाठी आणि वाद सामोपचाराने सोडवण्यासाठी पुढाकार घेत आहेत. भविष्यात या कट्ट्याची अधिकृत नोंदणी करून त्याचे कार्य अधिक व्यापक करण्याचा मानस ॲड. एन. डी. पाटील यांनी व्यक्त केला आहे.



# आदिवासी भागात गांडूळ खताचा नवा प्रयोग; सेंद्रिय शेतीला चालना

**पुणे (दै. संध्या)**

खेडेगावातील आदिवासी भागात सेंद्रिय शेतीला चालना देण्यासाठी गांडूळ खत निर्मितीचा अभिनव उपक्रम राबवण्यात येत आहे. बांबूंच्या साहाय्याने तयार करण्यात आलेल्या लाकडी पेट्यांमध्ये हा प्रकल्प उभारण्यात येत असून, काही पेट्या गोलाकार, काही चौकोनी तर काही आयताकृती स्वरूपाच्या आहेत. या पेट्यांमध्ये जनावरांचे शेण, झाडांचा पालापाचोळा, पिकांचे अवशेष तसेच भाजीपाल्याचा उरलेला भाग टाकून सेंद्रिय खत तयार केले जाते.

या प्रक्रियेत गांडुळे महत्त्वाची भूमिका बजावतात. रोज या मिश्रणावर पाणी शिंपडून योग्य ओलावा राखला जातो आणि काही दिवसांतच उत्कृष्ट प्रतीचे जैविक खत तयार होते. या खताला बाजारात मोठी मागणी असून सेंद्रिय शेतीसाठी ते अत्यंत



उपयुक्त ठरत आहे. या खताच्या वापरामुळे जमिनीची सुपीकता वाढते, रासायनिक खतांवरील अवलंबित्व कमी होते आणि शेती उत्पादनात लक्षणीय वाढ होत असल्याचे शेतकरी सांगतात.

हा उपक्रम सुयश चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या माध्यमातून राबवला जात असून महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांसह राजस्थान आणि ओडिशा राज्यांतही विस्तारला आहे. शेतकऱ्यांना कमी खर्चात सेंद्रिय खत निर्मितीचे प्रशिक्षण देऊन त्यांना स्वावलंबी बनवणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. अशा प्रकारच्या खत निर्मितीच्या पेट्या शेतकऱ्यांसाठी अत्यंत उपयुक्त ठरत असून त्या विकत घेण्यासाठी शासनाने आर्थिक योगदान द्यावे, अशी मागणी संस्थेकडून करण्यात आली आहे.

संस्थेचे संस्थापक अध्यक्ष यशवंत घैसास, कार्याध्यक्ष स्मिता घैसास आणि शलाका घैसास यांनी ही माहिती दिली.

विशेष म्हणजे, या प्रकल्पातून तयार होणारे गांडूळ खत साधारणपणे दीड महिन्याच्या कालावधीत तयार होण्यास सुरुवात होते. त्यानंतर आठवड्याच्या अंतराने खत काढले जाते. एक शेतकरी सरासरी दीड टनांपर्यंत गांडूळ खताची निर्मिती करू शकतो. तयार झालेले खत प्रामुख्याने स्वतःच्या शेतात वापरले जाते, तर अतिरिक्त खताची विक्री करून शेतकरी पूरक उत्पन्नही मिळवतात. त्यामुळे कमी खर्चात सेंद्रिय खत निर्मितीबरोबरच ग्रामीण व आदिवासी भागातील शेतकऱ्यांसाठी रोजगार आणि आर्थिक स्वावलंबनाची नवी संधी निर्माण होत आहे.

## रस्ता रुंदीकरणासाठी ९ आरसीसी इमारतींसह अनेक अतिक्रमणे जमीनदोस्त

**पुणे (दै. संध्या)**

कात्रज-कोंढवा रस्ता रुंदीकरणाच्या कामातील सर्वात मोठा अडथळा दूर करण्यासाठी पालिकेच्या संयुक्त पथकाने राजस सोसायटी परिसरात धडक कारवाई करत तब्बल ११ हजार ५०० चौ.मी. पेक्षा अतिक्रमणांवर कारवाई केली. त्यामध्ये ९ दुमजली पक्क्या आरसीसी इमारतींचाही समावेश आहे. महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांच्या मार्गदर्शनाखाली आणि अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे यांच्या थेट उपस्थितीत ही कारवाई करण्यात आली. पथ विभागाचे मुख्य अभियंता राजेश बनकर, अतिक्रमण प्रभारी रमेश शेलार यांच्या नियंत्रणाखाली पथ विभाग, बांधकाम विभाग, अतिक्रमण विभाग आणि भूसंपादन व व्यवस्थापन विभाग यांच्या संयुक्त पथकाने मोहीम राबवली.

या कारवाईत ९ पक्क्या स्वरूपाच्या दुमजली आरसीसी इमारती जमीनदोस्त केल्या आहेत. १४ पत्र्याचे शेड, १२ स्टॉल्स आणि सीमा भिंतींवर कारवाई करण्यात आली. या कारवाईसाठी मनपा प्रशासनाकडून ६ जेसीबी, १४ डम्पर, २ क्रेन, २५ बिगारी मजूर आणि महाराष्ट्र सुरक्षा दलाच्या जवानांचा मोठा फौजफाटा तैनात करण्यात आला होता.



## "झिरो वेस्ट कसबा-भवानी" प्रायोगिक प्रकल्पाला ३ महिन्यांची मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव!

**पुणे (दै. संध्या)**

पुणे महानगरपालिका आणि स्वच्छ पुणे सेवा सहकारी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने राबवण्यात येणाऱ्या "झिरो वेस्ट कसबा-भवानी" प्रायोगिक प्रकल्पाला तीन महिन्यांची मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव महापालिका प्रशासनाकडून स्थायी समिती समोर ठेवण्यात आला आहे. यावर समितीच्या आगामी बैठकीत चर्चा होणार आहे. कसबा-विश्रामबागवाडा क्षेत्रीय कार्यालयातील २३ आरोग्य कोठ्या, भवानी पेठ क्षेत्रीय कार्यालयातील १५ आरोग्य कोठ्यांमध्ये जुनी प्रभाग रचनेनुसार हा प्रकल्प राबवला जात आहे. या दोन्ही क्षेत्रांतील खासगी संस्थांमार्फत कचरा संकलन होणाऱ्या मालमत्ता वगळता इतर सर्व मालमत्तांचे दारोदारी कचरा संकलनाचे काम स्वच्छ संस्थेकडे सोपवण्यात आले आहे.

झोपडपट्टीतील स्लम सबसिडी प्रति घर २५ रुपयांवरून ५० रुपये करण्यात आली आहे. त्यामुळे ३२,३३५ झोपडपट्टीतील मालमत्तांसाठी दरमहा ८,०८,३७५ रुपये आणि तीन महिन्यांसाठी २४,२५,१२५ रुपयांची अतिरिक्त सबसिडी द्यावी लागणार आहे.

तसेच, झोपडपट्टीप्रमाणेच अल्प उत्पन्न गटातील मिळकतींचे शुल्क वसुलीत अडचणी येत असल्याने प्रभावी कचरा संकलनासाठी या गटातील ३६,१६१ मिळकतींना प्रति घर ५० रुपये प्रमाणे सबसिडी द्यावी लागणार आहे. त्यासाठी दरमहा १८,३०,५० रुपये आणि तीन महिन्यांसाठी ५४,९१,६५० रुपये मंजूर करण्यात यावे, असे प्रस्तावात म्हटले आहे. झोपडपट्टी आणि अल्प उत्पन्न गटातील मिळकतींमध्ये सातही दिवस विनाखंड कचरा संकलनासाठी अतिरिक्त ४७ स्वच्छ सेवकांची नियुक्ती करण्यात येणार आहे. प्रति सेवक प्रति महिना १८,००० रुपये प्रमाणे दरमहा १०,२६,००० रुपये आणि तीन महिन्यांसाठी ३०,७८,०००रुपयांची तरतूद करण्याची मागणी करण्यात आली आहे. प्रकल्प प्रभावीपणे राबवण्यासाठी अतिरिक्त ३५ पुशकार्ट आणि १४० बकेट, कोठीनिहाय विलगीकरण जागा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.

हा पायलट प्रकल्प १९ एप्रिल २०२६ ते १८ जुलै २०२६ या तीन महिन्यांच्या कालावधीसाठी पुणे मनपा आणि स्वच्छ पुणे सेवा सहकारी संस्था यांच्यात करार करण्यात येणार आहे. हा खर्च घनकचरा व्यवस्थापन बजेट कोड RE 19 A185- कसबा मतदार संघाच्या धर्तीवर प्रायोगिक तत्त्वावरील प्रकल्पांचे शहर स्तरावर अमलबजावणी करण्यासाठी ठेवलेल्या ३ कोटी रुपयांच्या तरतुदीतून करण्यात येणार आहे. यावर आता स्थायी समितीच्या आगामी बैठकीत चर्चा होणार आहे.

## हडपसर परिसरातील तुकाराम तुपे नगरमध्ये लाखो लिटर पाणी वाया!

### शिवसेनेचा महापालिकेवर दुटप्पीपणाचा आरोप

**पुणे (दै. संध्या)**

पुणेकरांना एका दिवसाआड पाणीपुरवठा करण्याचे नियोजन करून पाणी बचतीचे धडे देणाऱ्या पुणे महानगरपालिकेचाच दुटप्पी कारभार हडपसरच्या तुकाराम तुपेनगर परिसरात उघड झाला आहे. येथे गेल्या काही दिवसांपासून लाखो लिटर पिण्याचे पाणी रस्त्यावर वाहून जात असतानाही प्रशासनाने कोणतीही दखल घेतली नसल्याचा आरोप शिवसेना शहर प्रमुख प्रमोद नाना भानगिरे यांनी केला आहे.

भानगिरे यांनी म्हटले आहे की, "पुणेकरांनी प्रत्येक थेंब जपायचा आणि महानगरपालिकेने लाखो लिटर पाणी वाऱ्यावर उधळायचे, हा कसला कारभार?" पाणीटंचाईचे खापर नागरिकांच्या माथी फोडणाऱ्या अधिकाऱ्यांनी आधी स्वतःचा गळका आणि निष्क्रिय कारभार पाहावा, अशी टीका त्यांनी केली.



तुकाराम तुपेनगर येथे गळतीमुळे पाणी रस्त्यावर वाहून जात असून, हे महापालिकेच्या बेजबाबदारपणा, निष्काळजीपणा आणि अपयशी व्यवस्थेचे जिवंत प्रतीक असल्याचे भानगिरे यांनी म्हटले आहे.

लाखो लिटर पिण्याचे पाणी वाया घालवणाऱ्या बेजबाबदार अधिकारी आणि संबंधित कंत्राटदारांवर तात्काळ गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली आहे.

पुणे शहरात सध्या पाणीटंचाईमुळे एका दिवसाआड पाणीपुरवठा करण्याचे नियोजन सुरू आहे. अशा परिस्थितीत सार्वजनिक पाणीगळतीकडे दुर्लक्ष केल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे.

महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने याबत तातडीने दुरुस्ती करून जबाबदारांवर कारवाई करावी, अन्यथा आंदोलनाचा इशाराही भानगिरे यांनी दिला आहे.

## महिलांच्या गुणवत्तेला प्रोत्साहन दिल्यास रोजगार निर्मिती शक्य : संगीता देवकर

**पुणे (दै. संध्या)**

प्रत्येक महिलेमध्ये कोणत्यातरी प्रकारचे गुण दडलेले असतात. या गुणवत्तेला प्रोत्साहन दिल्यास ती महिला आपल्या पायावर उभी राहू शकते. एक महिला जर आपल्या पायावर उभी राहिली, तर ती निश्चितच आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण होऊन कुटुंबाला आधार देऊ शकते. महिलांच्या गुणवत्तेला प्रोत्साहन दिल्यास त्यामधून रोजगार निर्मिती शक्य होते, असे मत सामाजिक कार्यकर्त्या, राणी लक्ष्मीबाई महिला प्रशिक्षण संस्थेच्या प्रमुख संगीता देवकर यांनी व्यक्त केले.

रोटरी क्लब ऑफ पूना मिडटाऊन तर्फे सामाजिक क्षेत्रातील महत्त्वपूर्ण योगदानासाठी भांडारकर इन्स्टिट्यूट मधील सभागृहात संगीता देवकर यांना रोटरी क्लबचे डिस्ट्रीक्ट गव्हर्नर संतोष मराठे यांच्या हस्ते सेवा उत्कृष्टता गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यावेळी त्या बोलत होत्या. संस्थेचे प्रमुख डॉ. चंद्रशेखर वळव्हणकर, हेमंत तोडकर, शोभा सोमाणी आदी यावेळी उपस्थित होते. रोटरी क्लबच्या सामाजिक कार्यासाठी




आर्थिक योगदान देणाऱ्या डॉ. चंद्रशेखर वळव्हणकर, विद्यासागर जाधव, जोस्ना जाधव, सुनील हिंगमिरे, सचिन देशपांडे यांचा यावेळी गौरव करण्यात आला.

संगीता देवकर म्हणाल्या, पुणे महापालिकेच्या सहयोगाने २००४ मध्ये महाराणी लक्ष्मीबाई महिला प्रशिक्षण संस्था सुरू करण्यात आली . या संस्थेच्या माध्यमातून आतापर्यंत २२ हजार महिलांना ब्युटी पार्लर मोबाईल दुरुस्ती, मेकअप, मेहंदी अशा विविध प्रकारच्या गुणवत्ता प्रशिक्षण देण्यात आले. या महिलांनी स्वतःचे व्यवसाय सुरू केले आहे. यामुळे केवळ महिलाच स्वतःच्या पायावर उभे राहिलेल्या नाहीत तर त्यातून आम्ही कुटुंब स्वयंपूर्ण करण्यास मदत केली आहे.

त्या पुढे म्हणाल्या, राजकारण हे आळूच्या पानावरील दवा प्रमाणे असते. ते कायमस्वरूपी टिकत नाही. परंतु राजकारणाच्या माध्यमातून जर समाजकारण केले आणि समाजाला आपल्या पदाचा उपयोग करून देता आला, तर त्यामधून मिळणारे समाधान हे वेगळ्या प्रकारचे असते. राजकारण कायमस्वरूपी टिकत नाही, परंतु समाजकारण हे कायमस्वरूपी टिकते आणि त्याचा निश्चितच समाजामध्ये सकारात्मक बदल घडण्यास मदत होते, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

## ओरिएंट इलेक्ट्रिकचा 'एरोसायलेंट'– भारतातील सर्वात शांत फॅन

**पुणे (दै. संध्या)**

३ अब्ज अमेरिकन डॉलर्सची उलाढाल असलेल्या सीके बिर्ला समूहाचा भाग असलेल्या 'ओरिएंट इलेक्ट्रिक लिमिटेड 'ने आज एरोसायलेंट या भारताच्या सर्वात शांत पंख्याचे* अनावरण केले. हा पंखा ५० डेसिबलपेक्षा कमी आवाजाच्या पातळीवर चालतो आणि इतर सीलिंग फॅन्सच्या तुलनेत जवळपास २०% कमी आवाज करतो. आपल्या पुरस्कार-विजेत्या डिझाइनसह, एरोसायलेंट, तंत्रज्ञान आणि डिझाइनमधील नाविन्याचा मेळ साधून, कोणताही आवाज न करता प्रभावी कूलिंग प्रदान करतो.

ओरिएंटच्या प्रमुख 'एरो सिरीज'मध्ये नव्याने समाविष्ट झालेले एरोसायलेंट हे मॉडेल, एअर डिलिव्हरी आणि ऊर्जा बचतीच्या बाबतीतही उत्कृष्ट कामगिरी करते. ५० डेसिबल पेक्षा कमी आवाजाच्या पातळीवर अत्यंत शांतपणे कार्यरत असतानाही, एरोसायलेंट २६० सीएमएम पर्यंतचा हवेचा प्रवाह निर्माण करतो. यातील नाविन्यपूर्ण 'रिव्हर्स एअरफॉइल ब्लेड डिझाइन'मुळे हवेचा प्रवाह अधिक सुरळीत राहतो आणि त्यातील अडथळे (टर्ब्युलन्स) व आवाज कमी होतो, ज्यामुळे संपूर्ण खोलीत हवेचे प्रभावी अभिसरण सुनिश्चित होते. ओरिएंट इलेक्ट्रिकच्या बीएलडीसी प्रो मोटरवर चालणारा एरोसायलेंट हा पंखा, पारंपारिक इंडक्शन फॅनच्या तुलनेत ५०% ऊर्जेची बचत करतो आणि व्होल्टेजमधील चढ-उतारांदरम्यानही सातत्यपूर्ण कामगिरी देतो.

या उत्पादनाच्या लाँचप्रसंगी बोलताना 'ओरिएंट इलेक्ट्रिक'चे व्यवस्थापकीय संचालक आणि




सीईओ रवींद्र सिंग नेगी म्हणाले "ओरिएंट इलेक्ट्रिक येथे, अर्थपूर्ण तंत्रज्ञानाद्वारे उच्च दर्जाची जीवनशैली मिळवू पाहणाऱ्या ग्राहकांच्या बदलत्या गरजा पूर्ण करण्यावर आमच्या नाविन्यपूर्ण उपक्रमांचे लक्ष केंद्रित आहे. आम्ही नुकताच 'एरो ओ2' हा भारतातील पहिला ऑक्सिजन-समृद्ध करणारा पंखा बाजारात आणला असून, ग्राहकांकडून त्याला अत्यंत उत्साहवर्धक प्रतिसाद मिळाला आहे. आमच्या प्रमुख 'एरो सिरीज' मधील एरोसायलेंट या नवीनतम उत्पादनाद्वारे, आम्ही ग्राहकांच्या सर्वात सामान्य समस्यांपैकी एक असलेल्या 'पंख्याचा आवाज' यावर उपाययोजना करत आहोत; यासाठी आम्ही उत्कृष्ट हवा प्रवाह आणि कार्यक्षमता देणारा, भारतातील आतापर्यंतचा सर्वात शांत पंखा सादर करत आहोत. ग्राहकांकडून मिळालेला सविस्तर अभिप्राय आणि आर्किटेक्ट व इंटिरिअर डिझाइनर्सचे सखोल निष्कर्ष यांच्या आधारे याची रचना करण्यात आली असून, यामुळे आधुनिक घरांना एक उत्कृष्ट व आकर्षक स्वरूप प्राप्त होते. एरोसायलेंट हे तंत्रज्ञान, आराम आणि डिझाइन यांचा सुरेख मेळ घालणाऱ्या नाविन्यपूर्ण गोष्टींची निर्मिती करण्याच्या आमच्या कटिबद्धतेचे प्रतिबिंब आहे.

प्रतिष्ठित 'रेड डॉट डिझाइन अवॉर्ड २०२६' ने सन्मानित झालेला एरोसायलेंट, अभियांत्रिकी क्षेत्रातील उत्कृष्टतेचा सुरेख आणि आधुनिक सौंदर्यदृष्टीशी मेळ घालतो. क्लासिक सॉलिड कलर आणि प्रीमियम ड्युअल-टोन फिनिशमध्ये उपलब्ध असलेले हे उत्पादन, आधुनिक इंटिरिअर्सना साजेसे ठरेल अशा प्रकारे डिझाइन केले आहे, तसेच ते एक वैशिष्ट्यपूर्ण व संयमित शैलीही दर्शवते.

ओरिएंट इलेक्ट्रिकने अलीकडेच पेटंट केलेल्या बायो-ऑक्सी प्लाझ्मा आयन+ तंत्रज्ञानावर चालणारा, भारतातील पहिला ऑक्सिजन-समृद्ध सीलिंग फॅन, एरो ओ2 सादर केला आहे, आणि त्यानंतर हा लॉन्च करण्यात आला आहे. एकत्रितपणे, या नाविन्यपूर्ण गोष्टी कंपनीची ती वचनबद्धता दर्शवतात, जिच्याद्वारे आराम, आरोग्य आणि दैनंदिन जीवनशैली उंचावणाऱ्या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून 'सीलिंग फॅन'च्या श्रेणीचा नव्याने विचार केला जात आहे. एरोसायलेंट सह, ओरिएंट इलेक्ट्रिक आपल्या 'एरो सिरीज' उत्पादनांचा विस्तार करत आहे; आधुनिक घरांच्या बदलत्या गरजा पूर्ण करण्यासाठी यात शांत कार्यक्षमता, विचारपूर्वक केलेली रचना आणि ऊर्जा-कार्यक्षम तंत्रज्ञान यांचा संगम साधण्यात आला आहे.


## थोडक्यात पण महत्वाचे...



### गोपाळ गोविंद जाधव यांचे निधन

लोणी काळभोर (दैनिक संध्या) : गोपाळ गोंविद जाधव (वय-८५) यांचे कोळविहीरे येथे अल्पक्षा आजाराने निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी, एक मुलगा, दोन मुली, सुन,नातवंडे असा परिवार आहे. कोळविहीरे ग्रामपंचायतीचे माजी ग्रामपंचायत सदस्य राजेंद्र जाधव यांचे ते वडील होते.

### शाओमी 17T भारतात दाखल; प्रीमियम छायाचित्रण आणि दमदार बॅटरीची जोड



पुणे (दैनिक संध्या) : शाओमी इंडियाने लायका सह-विकसित प्रगत कॅमेरा तंत्रज्ञान, आकर्षक रचना आणि दमदार बॅटरी क्षमतेसह नवीन शाओमी 17T स्मार्टफोन भारतीय बाजारपेठेत सादर केला आहे. प्रगत छायाचित्रण, उत्कृष्ट दृश्य अनुभव, उच्च कार्यक्षमता आणि दीर्घकाळ टिकणारी बॅटरी यांचा समतोल साधणारा हा स्मार्टफोन प्रीमियम श्रेणीतील ग्राहकांसाठी विकसित करण्यात आला आहे. शाओमी 17T मध्ये लायका समर्थित त्रिकॅमेरा प्रणाली देण्यात आली असून त्यात ५० मेगापिक्सेल मुख्य कॅमेरा आणि टी मालिकेत प्रथमच ५ पट पेरिस्कोप दूरदृश्य कॅमेरा समाविष्ट करण्यात आला आहे. यामुळे जवळील सूक्ष्म तपशीलांसह दूरवरील दृश्येही स्पष्टपणे टिपता येणार आहेत.

## पुन्हा दिवसा वीजपुरवठा सुरू करा सभापती काकडे

लोणी काळभोर (दै. संध्या) :

हवेली तालुक्यातील थेऊर, नायगाव, व हिंगणगाव (AG) कृषी फिडर अंतर्गत येणाऱ्या सर्व गावांना पूर्वीप्रमाणेच दिवसा वीजपुरवठा सुरू करावा, अशी मागणी हवेली पंचायत समितीचे सभापती युवराज हिरामण काकडे यांनी, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे मुळशी विभागाचे कार्यकारी अभियंता देविदास बैकर व आमदार ज्ञानेश्वर कटके यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. सध्या या फिडरअंतर्गत येणाऱ्या गावांमधील शेतकऱ्यांना रात्रीच्या वेळेत वीजपुरवठा करण्यात येत असल्याने सिंचनासाठी मोठ्या अडचणी निर्माण होत आहेत. रात्री शेतात जाऊन मोटारी सुरू करणे, पाणी व्यवस्थापन करणे यामुळे शेतकऱ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. या भागात मोठ्या प्रमाणात बिबट्यांचा



वावर वाढल्याने हल्ल्याची भीती वाढली आहे. तसेच अन्य अनेक समस्यांना शेतकऱ्यांना रात्रीच्या वेळी सामोरे जावे लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. यापूर्वी या भागातील गावांना दिवसा वीजपुरवठा होत असल्याने शेतकऱ्यांना शेतीची कामे आणि सिंचनाचे नियोजन सुलभपणे करता येत होते. सध्या खरीप हंगामाची तयारी सुरू असल्याने दिवसा वीजपुरवठा होणे अत्यंत आवश्यक असल्याचेही काकडे यांनी म्हटले आहे.

# राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांची जागतिक पर्यावरण दिन कार्यक्रमास उपस्थिती

### पर्यावरण संवर्धनासाठी सामूहिक कृतीचे आवाहन

मुंबई (दै. संध्या) :

जागतिक पर्यावरण दिन २०२६ निमित्त वांद्रे येथील कार्टर रोड खुल्या रंगमंचावर आयोजित विशेष कार्यक्रमात महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी सहभाग नोंदवत पर्यावरण संवर्धनासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज अधोरेखित केली. 'आताच हवामानासाठी' आणि 'भूमी नमस्कार' या उपक्रमांतर्गत आयोजित कार्यक्रमात भामला प्रतिष्ठानचे अध्यक्ष आसिफ भामला यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. हवामान बदलाबाबत जनजागृती निर्माण करण्याबरोबरच प्रत्यक्ष कृतीला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने आयोजित या कार्यक्रमात पर्यावरण संरक्षणाचा संदेश देणाऱ्या देशव्यापी मोहिमेचे तसेच विशेष पर्यावरण गीताचे अनावरण करण्यात आले. यावेळी राज्यपालांच्या हस्ते 'पर्यावरण नेतृत्व पुरस्कार' प्रदान करण्यात आले. कार्यक्रमास सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार, गायक शंकर महादेवन, अभिनेते राघव जुयाल, वेशभूषाकार मनीष मल्होत्रा, आध्यात्मिक मार्गदर्शक गौर गोपाल दास, गायक टोनी कक्कर, अभिनेते अर्जुन बिजलानी, अभिनेत्री मन्नारा चोप्रा यांच्यासह सामाजिक, सांस्कृतिक आणि मनोरंजन क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी बोलताना आसिफ भामला




म्हणाले, "जागतिक पर्यावरण दिन ही केवळ दिनदर्शिकेतील तारीख नसून पृथ्वीप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याची आणि पर्यावरणपूरक कृती करण्याची संधी आहे.

'आताच हवामानासाठी' आणि 'भूमी नमस्कार' या उपक्रमांच्या माध्यमातून पर्यावरणीय जबाबदारी दैनंदिन जीवनाचा भाग बनविण्याचा आमचा प्रयत्न आहे." भामला प्रतिष्ठानने वृक्षारोपण, शहरी वनसंवर्धन, समुद्रकिनारा स्वच्छता, खारफुटी संवर्धन, कचरा व्यवस्थापन आणि जनजागृती मोहिमांद्वारे उल्लेखनीय कार्य केले आहे. संस्थेच्या माहितीनुसार, आतापर्यंत ५० हजारांहून अधिक वृक्ष लागवड, ५५० हून अधिक समुद्रकिनारा स्वच्छता उपक्रम, ८०० पेक्षा अधिक संस्थांचा सहभाग आणि ३० हजारांहून अधिक पर्यावरण रक्षकांचे जाळे उभारण्यात आले आहे.

## कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी केली नुकसानग्रस्त भागाची पाहणी; शेतकऱ्यांशी साधला संवाद

### वादळी पावसातील नुकसानग्रस्त भागाचे तात्काळ पंचनामे करण्याचे कृषिमंत्र्यांचे निर्देश

बारामती (दै. संध्या) :



राज्यात काल झालेल्या वादळी पावसामुळे २४ जिल्ह्यात अंदाजे १ लाख ५०० एकराचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. शेतकऱ्यांना लवकरात लवकर नुकसानभरपाई मिळण्याच्यादृष्टीने बाधित क्षेत्राचे तात्काळ पंचनामे करण्याचे जिल्हा प्रशासनाला निर्देश देण्यात असून याबाबतचा अहवाल प्राप्त होताच तातडीने मदत करण्यात येईल, असे राज्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले.

श्री.भरणे यांनी आज इंदापूर तालुक्यातील वडापुरी, सुरवड, गणेशवाडी, बावडा, टणू, पिंपरी बु. आणि लाखेवाडी भागात झालेल्या नुकसानीबाबत प्रत्यक्ष बांधावर जाणून पाहणी करुन शेतकऱ्यांना धीर दिला. तसेच बारामती तालुक्यातील नुकसानग्रस्त गावांनाही यावेळी भेट देऊन पाहणी केली. यावेळी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संजय काचोळे, तहसीलदार जीवन बनसोडे, तालुका कृषी अधिकारी दीपक गरगडे आदी उपस्थित होते.

श्री.भरणे म्हणाले, हवामान बदलामुळे आलेल्या राज्यात झालेल्या वादळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहेत; बाधित क्षेत्रातील एकही शेतकरी पंचनाम्यापासून वंचित राहणार नाही, याबाबत दक्षता घ्यावी. अशा परिस्थितीत कृषी विभागाने विविध योजनांचा लाभ देण्याची कार्यवाही करावी. नैसर्गिक संकटात शेतकऱ्यांनी खचून जावू नये, राज्य शासन आपल्या पाठीमागे खंबीरपणे उभे आहे, असेही श्री. भरणे म्हणाले.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजनेस मंत्रिमंडळात मंजूरी देण्यात आली आहे; या योजनेचा राज्यातील लाखो शेतकऱ्यांना लाभ मिळणार आहे. यापुढे शेतकरी कर्जबजारी होऊ नये यासाठी उपाययोजना करण्यात येत आहेत, असेही श्री. भरणे म्हणाले.

## एसएसआय मंत्रा रोबोटिक सिस्टिमचा विश्वविक्रम

पुणे (दै. संध्या) :

- २०,००० किलोमीटर अंतरावर बसून भारतीय शल्यचिकित्सकाने केली जगातील सर्वात लांब अंतरावरील हृदय टेली-सर्जरी

भारताच्या प्रगत रोबोटिक तंत्रज्ञानाने आणि भारतीय डॉक्टरांच्या कौशल्याने पुन्हा एकदा संपूर्ण जगाला थक्क केले आहे. प्रख्यात हृदय शल्यचिकित्सक डॉ. सुधीर श्रीवास्तव यांनी गयानामध्ये बसून भारतातील इंदूर येथे असलेल्या रुग्णाच्या हृदयावर यशस्वी रोबोटिक टेली-सर्जरी करून वैद्यकीय इतिहासात नवा विश्वविक्रम प्रस्थापित केला आहे. सुमारे २०,००० किलोमीटर अंतरावरून करण्यात आलेली ही शस्त्रक्रिया जगातील आतापर्यंतची सर्वात लांब अंतरावरील रोबोट-सहाय्यित हृदय टेली-सर्जरी मानली जात आहे.

ही ऐतिहासिक प्रक्रिया गयानातील जॉर्जटाउन पब्लिक हॉस्पिटल कॉर्पोरेशन (GPHC)




आणि भारतातील IRCAD इंडिया, इंदूर यांच्यामध्ये यशस्वीपणे पार पडली.या यशाची सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे ही शस्त्रक्रिया पूर्णपणे भारतात विकसित करण्यात आलेल्या एसएसआय मंत्रा सर्जिकल रोबोटिक सिस्टम च्या सहाय्याने करण्यात आली.

डॉ. सुधीर श्रीवास्तव यांनी गयानामध्ये असलेल्या SSI MantrAsana Tele-Surgeon Console वरून शस्त्रक्रिया नियंत्रित केली, तर रुग्ण इंदूर येथील IRCAD इंडिया येथे उपस्थित होता. रोबोटिक आर्म्सनी डॉक्टरांच्या हातांच्या हालचालींची रिअल-टाइममध्ये अचूक पुनरावृत्ती करत हृदयावरील गुंतागुंतीची Left Internal Mammary Artery (LIMA) Takedown प्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण केली.

सुमारे २९० ते ३०० मिलीसेकंद नेटवर्क लेटन्सी असूनही संपूर्ण शस्त्रक्रिया अत्यंत अचूकता आणि स्थिरतेने पार पडली. या प्रक्रियेदरम्यान भारतात मणिपाल हॉस्पिटल, जयपूर येथील मुख्य हृदय शल्यचिकित्सक डॉ. ललित मलिक हे टेबल-साइड सर्जन म्हणून उपस्थित होते.

## पुण्यातील कार पार्किंगच्या समस्येवर तोडगा?

पुणे (दै. संध्या) :

- जंगली महाराज रस्त्यावर नवे मल्टी लेव्हल पार्किंग उभारण्याचा स्थायी समितीसमोर प्रस्ताव
- PPP तत्त्वावर प्रकल्पाची शिफारस

पुणे शहरात वाढत्या वाहनांमुळे निर्माण झालेली कार पार्किंगची समस्या सोडवण्यासाठी छत्रपती संभाजी महाराज उद्यान, जंगली महाराज रस्ता येथे जुने आणि वापरासाठी अयोग्य झालेले मल्टी लेव्हल पार्किंग स्थळ पाडून त्याजागी नवे आधुनिक मल्टी लेव्हल कार पार्किंग उभारण्याचा प्रस्ताव स्थायी समितीसमोर ठेवण्यात आला आहे.

राष्ट्रवादी कांग्रेस चे नगरसेवक अमोल बालवडकर आणि सुहास टिंगरे यांनी हा प्रस्ताव मांडला आहे. शहरातील विविध ठिकाणी आधुनिक मल्टी लेव्हल कार पार्किंग स्थळांची गरज लक्षात घेऊन प्रशासनाने या जागेवर नव्याने पार्किंग उभारण्याचे नियोजन करावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

प्रस्तावानुसार, सदर जागेवर पुन्हा नव्याने आधुनिक मल्टी लेव्हल कार पार्किंग स्थळ PPP म्हणजेच सार्वजनिक-खासगी भागीदारी तत्त्वावर उभारणे ही काळाची गरज आहे. स्थायी समितीसमोर हा प्रस्ताव ठेवण्यात आला असून आगामी बैठकीत यावर निर्णय होण्याची शक्यता आहे. मंजुरी मिळाल्यास पुण्यातील मध्यवर्ती भागातील पार्किंगचा ताण काही प्रमाणात कमी होण्याची अपेक्षा आहे.

## पुण्यात वाहतूक सुरळीत करण्यासाठी 500 AI कॅमेरे

पुणे (दै. संध्या) :

- 'ITMS' प्रकल्पाचा अहवाल सरकारकडे
- पुणे ट्रॅफिक परिषदेत अपर आयुक्त मनोज पाटील यांची माहिती
- नागरिकांना सहकार्याचे करण्याचे आवाहन




पुण्यातील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी पोलिस दल 'तंत्रज्ञान, तज्ज्ञ सल्ला आणि नागरिकांचे सहकार्य' या त्रिसूत्रीचा अवलंब करणार आहे. शहरात लवकरच 500 कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) कॅमेरे बसवले जाणार असून, मुंबईच्या धर्तीवर अत्याधुनिक वाहतूक नियंत्रण प्रणाली कार्यान्वित केली जाणार आहे, अशी माहिती अपर पोलीस आयुक्त (वाहतूक) मनोज पाटील यांनी दिली.

पुणे शहर जिल्हा काँग्रेसच्या पश्चिम विभागातर्फे शनिवारी पत्रकार संघात 'पुणे ट्रॅफिक परिषद' आयोजित करण्यात आली होती. या वेळी पाटील बोलत होते.

पाटील म्हणाले, वाहतूक कोंडीमुळे प्रत्येक पुणेकराच्या आयुष्यातील सरासरी दोन वर्षे रस्त्यावर वाया जात आहेत. नव्या AI कॅमेऱ्यांद्वारे नियमभंग करणाऱ्यांवर मानवी हस्तक्षेपाशिवाय स्वयंचलित दंडात्मक कारवाई होईल. 'इंटेलिजंट ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टीम'चा अहवाल मंजुरीसाठी राज्य सरकारकडे पाठवला आहे. अरुंद रस्त्यांवर अल्पकालीन नियोजन करून JM रोड आणि FC रोडची क्षमता वाढवली असल्याचेही त्यांनी सांगितले.

शहरात 44 लाखांहून अधिक वाहने असून, 30 लाख दुचाकी आणि 9 लाख चारचाकी आहेत, अशी माहिती उपप्रादेशिक परिवहन अधिकारी सुरेंद्र निकम यांनी दिली.

केवळ तंत्रज्ञानावर विसंबून न राहता नागरिकांनी नियम पाळावेत, तसेच कंपन्यांनी आठवड्यातून एक दिवस 'सार्वजनिक वाहतूक दिन' पाळावा, अशी शिफारस पाटील यांनी केली.

परिषदेत कांग्रेस शहर अध्यक्ष दीप्ती चवधरी, संदीप भाजीभाकरे, एलिस पोरे, डॉ. राहुल सावंत, मंगेश कोळपकर यांच्यासह वाहतूक तज्ज्ञ आणि लोकप्रतिनिधी उपस्थित होते. आगामी काळात 100 किमी मेट्रो जाळे आणि हायटेक यंत्रणा यामुळे वाहतूक समस्या सुटेल, असा विश्वास पाटील यांनी व्यक्त केला.

# बिगर शेती परवान्याच्या कामात ३५ लाखांची फसवणूक

### बनावट कागदपत्रांचा आरोप, वाघोली पोलिस ठाण्यात तक्रार

वाघोली (दै. संध्या) :

हवेली तालुक्यातील केसनंद येथील शेतकरी बाबासाहेब तुकाराम हरगुडे यांनी बिगर शेती (एन.ए.) परवाना मिळवून देण्याच्या नावाखाली तब्बल ३५ लाख रुपयांची फसवणूक झाल्याची तक्रार वाघोली पोलिस ठाण्यात दाखल केली आहे. संबंधित प्रकरणात बनावट कागदपत्रांचा वापर करून शासकीय यंत्रणेची दिशाभूल केल्याचाही आरोप करण्यात आला आहे.

तक्रारदार बाबासाहेब हरगुडे यांच्या म्हणण्यानुसार, मौजे केसनंद (ता. हवेली, जि. पुणे) येथील गट क्रमांक १७२ मधील जमीन बिगर शेती करण्यासाठी तसेच आवश्यक शासकीय मंजुरी, ना-हरकत दाखले




आणि इतर परवानग्या मिळविण्याचे काम सुरुवातीला आर्किटेक्ट अमित आव्हाळे यांच्याकडे सोपविण्यात आले होते. त्यानंतर अरुण दत्तात्रय गायकवाड यांनी संपर्क साधून परिसरातील अनेक प्रकरणे यशस्वीरीत्या पूर्ण केल्याचा दावा करत संबंधित काम स्वतःकडे घेतले.

गायकवाड यांनी सदर प्रकरण अंतिम टप्प्यात असून फाईल पीएमआरडीए कार्यालयात विचाराधीन असल्याचे सांगून तक्रारदाराचा विश्वास संपादन केला. तक्रारदार शेती व दुग्ध व्यवसायात व्यस्त असल्याने त्यांनी संपूर्ण प्रक्रिया गायकवाड यांच्याकडे सोपविली. त्यानुसार वेळोवेळी रोख रक्कम व धनादेशाद्वारे पैसे देण्यात आल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

तक्रारीनुसार, संबंधित कागदपत्रे अरुण गायकवाड यांनी स्वतःच्या नावाने अर्ज करून केसनंद येथील गाव कामगार तलाठी शुभम वाबळे यांच्याकडे पडताळणीसाठी सादर केली होती. कागदपत्रांची तपासणी करताना गंभीर त्रुटी व संशयास्पद बाबी आढळल्याने हे प्रकरण पुढील चौकशीसाठी अप्पर तहसीलदार तृप्ती कोलते यांच्याकडे पाठविण्यात आले.

अप्पर तहसीलदारांनी सखोल चौकशी करून संबंधित कागदपत्रे भूमी अभिलेख विभागाकडे पडताळणीसाठी पाठविली. भूमी अभिलेख विभागाच्या तपासणीत सदर कागदपत्रे बनावट व बोगस असल्याचे निष्पन्न झाल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

दरम्यान, ५ जून २०२६ रोजी एका दैनिकात प्रसिद्ध झालेल्या वृत्तातून या प्रकरणाची माहिती समोर आल्यानंतर बाबासाहेब हरगुडे यांनी अरुण गायकवाड यांच्याशी दूरध्वनीवर संपर्क साधला. त्यावेळी गायकवाड यांनी घेतलेली संपूर्ण रक्कम परत करण्याचे आश्वासन दिल्याचा दावा तक्रारदाराने केला आहे. मात्र त्यानंतर त्यांचा मोबाईल क्रमांक बंद असून त्यांच्याशी संपर्क होत नसल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

हरगुडे यांनी आपल्या तक्रारीत म्हटले आहे की, विश्वास संपादन करून बनावट कागदपत्रांच्या आधारे आर्थिक फसवणूक करण्यात आली. वेळोवेळी रोख रक्कम व धनादेशाद्वारे एकूण ३५ लाख रुपये देण्यात आले असून उर्वरित रक्कम काम पूर्ण झाल्यानंतर देण्याचे ठरले होते.

या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित व्यक्तीविरुद्ध भारतीय न्याय संहितेअंतर्गत फसवणूक, बनावट कागदपत्रे तयार करणे, खोटी कागदपत्रे वापरणे तसेच इतर लागू कायद्यांनुसार गुन्हे दाखल करण्यात यावेत, अशी मागणी तक्रारदाराने वाघोली पोलिसांकडे केली आहे. तसेच फसवणुकीने घेतलेली रक्कम परत मिळवून देण्यासाठी आवश्यक ती कायदेशीर कारवाई करण्याची मागणीही करण्यात आली आहे.

या प्रकरणामुळे बिगर शेती परवाना प्रक्रियेत वापरल्या जाणाऱ्या कागदपत्रांच्या पडताळणीबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले असून पोलिस तपासातून आणखी महत्त्वाची माहिती समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## जाहीर नोटीस

प्रति,

सर्व लोकांस विशेषतः गांव हिवरे बु।।, ता. जुन्नर, जि. पुणे येथील व परिसरातील सर्व लोकांस,

आमचे आशील १) श्री. दिलीप बबन देशमुख २) श्री. संतोष बबन देशमुख, दोघेही रा. हिवरे बु।।, ता. जुन्नर, जि. पुणे आज समक्ष जुन्नर यांनी प्रत्यक्ष सांगितलेवरून व दिलेल्या माहितीप्रमाणे जाहीररित्या कळविणेत येते ते येणे प्रमाणे :-

**१) मिळकतिचे वर्णन :-** तु. व जि. पुणे पो. तु. दुय्यम निबंधक नारायणगांव, ता. व पंचायत समिती जुन्नर, जि. प. पुणे पैकी ग्रामपंचायत हिवरे बु।। चे हद्दीतील मिळकत.

ग.नं. ७०७ क्षेत्र ०१ हे ५४ आर, आकार १० रू. ०६ पैसे

येणे प्रमाणे वर्णनाची बागायत शेतजमीन

यापैकी ०० हे ६९ आर पश्चिमेची

यांसी चतुःसिमा :- पुर्वेस – ग.नं. ७०७ पैकी, दक्षिणेस - ग.नं. ७०७ पैकी रामचंद्र महादेव देशमुख यांचे हिश्याची मिळकत, पश्चिमेस - दत्तात्रय मोरे यांची जमीन व उत्तरेस - रस्ता.

येणेप्रमाणे वर्णनाची मिळकत जाणेयेणेचे वहिवाटीचे सर्व हक्कासह.

२) वर नमूद केलेली मिळकत आमचे आशिलांचे कुटुंबाचे मालकी हक्काने निर्वेध ताब्रेवहिवाटीस असून आमचे आशील वर नमूद मिळकतीमध्ये सालोसाल मालकी हक्काने मेहनत-मशागत करून उत्पन्न घेत आलेले आहेत. वर नमूद मिळकतिचे मालकी वहिवाटीशी व ताब्याशी वाटपापासून आमचे आशिलांचे चुलते विठ्ठल महादेव देशमुख यांचा अगर त्यांचे वाली-वारसांचा कुठल्याही प्रकारचा हक्कसंबंध नव्हता व आजही नाही. असे असताना केवळ वाटपाबाबतची गावचे हक्कनोंदणीस नोंद होणेचे राहून गेले व त्यामुळे विठ्ठलचे वारसांची गावचे हक्कनोंदणीस पोकळीस्त व अनाधिकाराची नोंद राहून गेल्याचा गैरफायदा घेणेचे व त्याअनुषंगाने काही अनुचीत लाभ उठविण्याचे हेतुने विठ्ठल महादेव देशमुख यांचे वारस वर नमूद जमिनीचे संदर्भात काही अनाधिकाराचा, बिनताब्याचा एव्हढेच नव्हेतर अम्मलबजावणीस अपात्र असा हस्तांतराचा व्यवहार करणेचे प्रयत्नात असून काही लोक त्याबाबत बोलणी करीत असल्याचे आमचे आशिलांस खात्रीलायकरित्या समजते.

तरी सर्व लोकांस अशी समज देणेत येते की,

वर नमूद 'जमिनीचे संदर्भात कोणीही विठ्ठल महादेव देशमुख यांचे वाली-वारस १) शंकर विठ्ठल देशमुख २) बाळासाहेब विठ्ठल देशमुख ३) मालती देवराम बोऱ्हाडे ४) शारदा सुरेश वायकर ५) मनिषा नवनाथ कोकाटे यांचेबरोबर कोणीही खरेदी, विक्री, दान, गहाण, लिज, बक्षीस अगर अन्य कुठल्याही प्रकारे तबदिलीचा व्यवहार व त्याअनुषंगाने करार-मदार करू नयेत. एव्हढेच नव्हेतर कुठल्याही वित्त पुरवठा करणारे संस्थेने वर नमूद जमिनीवर संबंधीत इसमांना कर्ज पुरवठा करू नये, अन्यथा तसले कुठलेही हस्तांतराचे व्यवहार त्याचप्रमाणे करार-मदार, गहाणखते, आमचे आशिलांचे वर नमूद मिळकतीमधील मालकी हक्कावर व ताब्यावर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

कुणाचीही फसवणूक होवू नये म्हणून आगावू प्रसिध्दीस दिली असे.

कळावे — येणे प्रमाणे जाहीर नोटीस

दि. ०५/०६/२०२६

सही/-
**श्री. कौस्तुभ पी. कर्पे**
**बी.एस.एल., एल.एल.एम. ॲडव्होकेट**
**"आशियाना", "ईशान", ॐ शक्तीनगर,**
**किल्ले शिवनेरी पायथा, जुन्नर, जि. पुणे**
**महा./१८३४/२०१४ मो. ७७६७०९३८६२**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः गांव मौजे आळेफाटा, ता. जुन्नर, जि. पुणे येथील व आसपासचे परिसरातील लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

खालील परिशिष्टात नमुद केलेल्या मिळकती संदर्भात सौ. सुचेता वसंत खोकले रा. आळेफाटा, ता. जुन्नर, जि. पुणे हे खालील परिशिष्टात नमुद केलेल्या मिळकतीचे कायदेशीर मालक आहेत व आमचे आशिल श्री. अय्युब उस्मान शेख रा. प्लॉट नं. २०४, दुसरा मजला, डि-अर्चीड, रिवर पॅलम्स, मिलत नगर, भिवंडी, ठाणे. ४२१३०२, यांच्या बरोबर सदर मिळकतीबाबत तबदिलीचा / खरेदीचा व्यवहार ठरविला आहे.

खालील परिशिष्टात वर्णनातील मिळकत निर्वेध व निजोखमी आहे. सदर मिळकतीवर कोणाचा काहीही एक दान, गहाण, पोटगी, खरेदी-विक्री, साठेखत, करारनामा, बक्षीसपत्र, लिज, लिन, कोर्ट दावा नाही. असे सौ. सुचेता वसंत खोकले रा. आळेफाटा, ता. जुन्नर, जि. पुणे यांनी आमचे आशिलाना सांगितले आहे. परंतु यापुर्वी कोणीही कसलाही व्यवहार, कोर्ट दावा व इतर तक्रारी या मिळकती बाबत केला असेल तर त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासून १५ दिवसांचे आत खालील नमूद पत्त्यावर कागदपत्रानिशी संपर्क साधावा अन्यथा सदर मिळकतीमध्ये कोणाचेही कसल्याही प्रकारचे हक्क हितसंबंध नाहीत. असे समजुन आमचे आशिल श्री. अय्युब उस्मान शेख यांचे बरोबर व्यवहार पुर्ण करतील मग मात्र कोणाचीही कोणतीही तक्रार ऐकुण घेतली जाणार नाही, तेव्हा कोणाचाही काहीही हित संबंध असल्यास तो त्यांनी जाणीवपूर्वक सोडुन दिला आहे. असे समजण्यात येईल व आमचे अशिल सदरचा मिळकती बाबतचा व्यवहार पुर्ण करतील याची नोंद घ्यावी.

**- परिशिष्ठ -**

मिळकतीचे वर्णन :- तु. पुणे, पो. तु. ता. जुन्नर, जि. पुणे सब-रजिस्टार सो. जुन्नर यांचे हद्दीतील व पंचायत समीती जुन्नर यांचे हद्दीतील गांव मौजे आळेफाटा येथील जिरायत / बागायत शेतजमीन लिहून देणार यांची खरेदी मालकीची रस्ते लगतची बागायत जिरायत शेत जमिनीचे लिहुन घेणार यांना खरेदीखताने देत आहे ते खालील प्रमाणे.

| गट नं. | क्षेत्र हे. आर | आकार रु./पै. |
|---|---|---|
| १०४ | ०.३६ एकुण | ०.८४ |

या पैकी लिहून देणार यांची खरेदी मालकीची खाते क्र. १०२७ वरील शेत जमिनी खरेदीखत करून देत आहे ते खालील प्रमाणे.

| गट नं. | क्षेत्र हे. आर | आकार रु./पै. |
|---|---|---|
| १०४ पैकी | ०.२४ | ०.५६ |

येणेप्रमाणे वर्णनाची मिळकत त्यातील झाड झाडोरा लाकूड फाटा, दगड विट, माती, पाणी व त्यामधील सर्व प्रकारचे वहिवाटीचे व जाण्यायेण्याच्या रस्त्याचे वहिवाटीच्या हक्कासहित तसेच कोणत्याही प्रकारचे हक्क व अधिकार राखुन न ठेवता दरोबस्त, अशी मिळकत.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस
दि.०६/०६/२०२६,

सही/-
ॲडव्होकेट
श्री. इनामदार शकिल अ. रहेमान
राहील कॉम्प्लेक्स, नेहरुबाजार,
जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे.

## थोडक्यात पण महत्वाचे...






### कै.भिकू वाघेरे पाटील यांच्या 40 व्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी-चिंचवडचे माजी महापौर कै. भिकू वाघेरे पाटील यांच्या ४० व्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून भावपूर्ण अभिवादन करण्यात आले. यावेळी विविध मान्यवरांच्या उपस्थितीत स्मृतिदिन कार्यक्रम उत्साहात पार पडला. या प्रसंगी पिंपरी-चिंचवड समाजभूषण पुरस्कार ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. एस. बी. चांडक यांना प्रदान करून त्यांच्या सामाजिक व सार्वजनिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याचा गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाला आमदार अमित गोरखे, महापौर रवि लांडगे, उपमहापौर शैलजा बाबर, स्थायी समितीचे सभापती अभिषेक बारणे, भाजप शहराध्यक्ष शत्रुघ्न उर्फ बापू काटे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, नगरसेवक विठ्ठल उर्फ नाना काटे, नगरसेविका स्वाती (माई) काटे, शिवसेना (उबाठा) शहराध्यक्ष चेतन पवार, माजी उपमहापौर प्रभाकर वाघेरे यांच्यासह विविध राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व सहकार क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. तसेच माजी नगरसेवक अरुणभाऊ बोऱ्हाडे, फजलभाई शेख, दत्तात्रय वाघेरे, हनुमंत नेवाळे, नरहरी कापसे, सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब (आप्पा) वाघेरे, नानिक पंजाबी, गणेश ढाकणे, उद्योजक गणेश कुदळे, उषाताई वाघेरे, अनिता वाळुंजकर, शोभा मुंढे, कन्या विद्यालयाच्या प्राचार्य परदेशी मॅडम, दत्तात्रय मासुळकर, डॉ. पांडुरंग भोसले, अजय जयसिंग कापरे, पवना सहकारी बँकेचे संचालक शिवाजी वाघेरे व बिपीनशेठ नाणेकर, उद्योजक विजय काटे, दिलीप देवकर, यशवंत साखरे, काळूराम लांडगे यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ बंधू-भगिनी उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी कै. भिकू वाघेरे पाटील यांच्या सामाजिक, राजकीय आणि जनसेवेतील योगदानाचा गौरवपूर्ण उल्लेख करत त्यांच्या कार्याचा आदर्श पुढील पिढ्यांनी घ्यावा, असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.






### भीमशक्तीनगर मध्ये विद्युत तारा लोंबकळल्याने नागरिकांच्या जीवितास धोका

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी-चिंचवड शहरातील स्पाईन रोडलगत असलेल्या भीमशक्तीनगर परिसरात विद्युत तारा धोकादायकरित्या खाली लोंबकळत असल्याने नागरिकांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण झाला आहे. याबाबत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते तथा सामाजिक कार्यकर्ते मारुती जाधव यांनी महावितरणच्या भोसरी विभागाचे कार्यकारी अभियंता विश्वनाथ लहाने यांच्याकडे लेखी तक्रार दाखल करून तातडीने दुरुस्तीची मागणी केली आहे. मारुती जाधव यांनी निवेदनात म्हटले आहे की, भीमशक्तीनगरमधील दाट लोकवस्तीच्या भागात विद्युत तारा अत्यंत खाली आल्या असून त्या नागरिकांच्या घरांजवळ तसेच रस्त्यालगत धोकादायक स्थितीत आहेत. परिसरात सुमारे दहा हजारांहून अधिक नागरिक वास्तव्यास असून दररोज मोठ्या प्रमाणात पादचारी आणि वाहनांची वर्दळ असते. विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, मागील काही वर्षांपासून ही समस्या कायम असून संबंधित विभागाकडून अद्याप प्रभावी उपाययोजना करण्यात आलेल्या नाहीत. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर वादळी वारे आणि मुसळधार पावसामुळे या तारा तुटण्याची शक्यता वाढली असून त्यामुळे मोठी दुर्घटना घडण्याची भीती व्यक्त केली जात आहे. कोणतीही दुर्दैवी घटना घडण्यापूर्वी महावितरण प्रशासनाने तात्काळ पाहणी करून लोंबकळणाऱ्या तारा उंचावाव्यात, आवश्यक दुरुस्ती करावी आणि कायमस्वरूपी उपाययोजना राबवाव्यात, अशी मागणी मारुती जाधव यांनी केली आहे. नागरिकांच्या जीविताशी संबंधित हा गंभीर प्रश्न असल्याने महावितरण प्रशासनाने तातडीने दखल घेऊन कारवाई करावी, अशी जोरदार मागणी भीमशक्तीनगर परिसरातील नागरिकांकडून करण्यात येत आहे.

### पिंपरी-चिंचवडमध्ये दिशादर्शक फलकांची दुरवस्था; स्मार्ट सिटी दाव्यांवर प्रश्नचिन्ह

पिंपरी: शहरातील रस्त्यांवर उभे असलेले दिशानिर्देशक, उपनगरांची नावे दर्शविणारे फलक, धोक्याच्या सूचना देणारे बोर्ड आणि मार्गदर्शक चिन्हे ही केवळ लोखंडी रचना नसून, शहराची ओळख आणि नागरिकांसाठी मार्गदर्शनाची महत्त्वाची साधने आहेत. मात्र, पिंपरी-चिंचवड शहरात याच फलकांची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. शहरातील बहुतांश फलक तुटलेले, वाकलेले, अक्षरे उडालेली किंवा पूर्णपणे ओळख हरवलेल्या अवस्थेत असल्याचे वास्तव दिसून आले. शहराच्या विविध भागांमध्ये केलेल्या पाहणीत दिशानिर्देशक फलकांवरील नावे गायब झालेली, बॅनरबाजीमुळे दडलेली, काही ठिकाणी फक्त लोखंडी चौकट उभी असलेली तर, काही ठिकाणी संपूर्ण फलकच कोसळण्याच्या अवस्थेत असल्याचे आढळले. नागरिकांना सुरक्षिततेचा इशारा देणारे धोक्याचे फलकही स्वतःच धोकादायक स्थितीत उभे असल्याने सुरक्षाव्यवस्थेच्या दाव्यांवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. वाढदिवस, जयंती आणि राजकीय कार्यक्रमांसाठी लावलेले फ्लेक्स काही दिवसांनी काढले जातात. मात्र, त्यासोबत फलकावरील मूळ माहितीही निघून जाते. परिणामी नागरिकांच्या उपयोगाचे फलक केवळ रिकाम्या चौकटी बनून उभे राहतात. रस्ते, चौक आणि उपनगरांच्या प्रवेशद्वारांवर उभे असलेले फलक हे शहराचा चेहरा असतात. जर हाच चेहरा तुटका, जीर्ण आणि दुर्लक्षित दिसत असेल तर, शहराच्या विकासाच्या दाव्यांकडे नागरिक कोणत्या नजरेने पाहतील, हा खरा प्रश्न आहे. शहरातील अनेक चौक, मुख्य रस्ते आणि सार्वजनिक ठिकाणी परवानगीशिवाय उभारण्यात आलेली अनधिकृत होर्डिंग्ज आणि फ्लेक्स नागरिकांसाठी डोकेदुखी ठरत आहेत. अनेकदा ही होर्डिंग्ज दिशा निर्देशक आणि अधिकृत फलक झाकून टाकतात. त्यामुळे महत्त्वाची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचत नाही. काही ठिकाणी कालबाह्य झालेली होर्डिंग्ज अनेक महिने तशीच उभी असल्याचे दिसून येते. पावसाळा आणि जोरदार वार्यामुळे अशा होर्डिंग्ज कोसळण्याचा धोका वाढतो. यापूर्वी राज्यातील विविध शहरांमध्ये होर्डिंग्ज कोसळून दुर्घटना घडल्याच्या घटनाही समोर आल्या आहेत. तरीही शहरातील अनधिकृत होर्डिंग्जवर प्रभावी कारवाई होत नसल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

# देहूरोड येथील केंद्रीय विद्यालय, ऑर्डनन्स फॅक्टरी येथे भुयारी मार्ग होणार: खासदार श्रीरंग बारणे यांची माहिती

पिंपरी (दै. संध्या)

देहूरोड निगडी रस्त्यावर केंद्रीय विद्यालय व देहूरोड ऑर्डनन्स फॅक्टरी या दरम्यान दोन भुयारी मार्ग (अंडरपास) मंजूर झाले आहेत. या भुयारी मार्गाचे काम सुरू करण्यास सदन कमांड ब्रिगेडियर आणि कॅन्टोन्मेंट बोर्डाने तत्वतः मान्यता दिली आहे. त्यामुळे अनेक वर्षांपासून रखडलेले भुयारी मार्गाचे काम सुरू करण्याचा मार्ग मोकळा झाला असल्याचे मावळचे शिवसेना श्रीरंग बारणे यांनी सांगितले.

देहूरोड येथील सदन कमांड येथे एनचआय एमएसआरडीसी, देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्ड , देहूरोड ऑर्डनन्स फॅक्टरी प्रतिनिधी आणि ब्रिगेडर यांच्या प्रमुख अधिकारी व संबंधित विभागाचे प्रमुख यांच्या बरोबर विविध प्रश्नांसंदर्भात खासदार बारणे यांनी शनिवारी आढावा बैठक घेतली. सदन कमांड ब्रिगेडियर आशिष कटोज, कर्नल अमित श्रीवास्तव, देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डाचे मुख्य कार्यकारी अधिकारी हेमंत यादव, एमएसआरडीसीचे उपअभियंता विकास पिंपळकर, देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डाचे सदस्य कैलास पानसरे, शिवसेना देहूगाव शहर प्रमुख सुनिल हगवणे, युवासेना मावळ लोकसभा अध्यक्ष राजेंद्र तरस, ऑर्डनन्स फॅक्टरी देहूरोड एम्प्लॉय युनियन अध्यक्ष मोहन घुले उपस्थित होते. देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या हद्दीतील प्रलंबित प्रश्न, चालू असलेली कामे याचा आढावा घेण्यात आला. खासदार बारणे म्हणाले, देहूरोड निगडी रस्त्यावर केंद्रीय विद्यालय व देहूरोड ऑर्डनन्स फॅक्टरी या दरम्यान दोन भुयारी मार्ग मंजूर झाले आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून एमएसआरडीसीकडून भुयारी मार्गाला मान्यता मिळाली आहे. या भुयारी मार्गाचे काम सुरू करण्याबाबत चर्चा झाली. त्याला सदन कमांड ब्रिगेडियर आणि कॅन्टोन्मेंट बोर्डाने तत्वतः मान्यता दिली. त्यामुळे अनेक वर्षांपासून रखडलेले काम सुरू होईल. काळोखे मळा ते हगवणे वस्तीदरम्यानचा रस्ता संरक्षण विभागाच्या जागेतून जातो. रस्त्याची प्रचंड दुरवस्था झाली आहे. या रस्त्यावरील खड्डे तत्काळ बुजविण्यात येणार आहेत.




श्री संत तुकाराम महाराजांची पालखी पुढील महिन्यात पंढरपूरला जाणार आहे. पालखी मार्ग संरक्षण विभागाच्या जागेतून जातो. या रस्त्यांची दुरवस्था झाली आहे. या रस्त्यांची सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने दुरुस्ती करण्यात येणार आहे. त्याला ब्रिगेडियर यांनी मान्यता दिली आहे. किवळे येथील महावितरणची लाईन संरक्षण विभागातून जात आहे. त्याबाबतही बैठकीत चर्चा झाल्याचे खासदार बारणे यांनी सांगितले.

## अवैध दारू, बनावट मद्यनिर्मिती विरोधात पोलीस ॲक्शनमध्ये

पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड शहर आणि पुणे ग्रामीण परिसरातील अवैध दारू व्यवसायाचे संपूर्ण उच्चाटन करण्यासाठी पोलिस व राज्य उत्पादन शुल्क विभागाने संयुक्तपणे कारवाई करण्याचा निर्णय घेतला आहे. या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयात महत्त्वपूर्ण समन्वय बैठक आयोजित करण्यात आली.



पोलिस आयुक्त विनय कुमार चौबे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या बैठकीत पोलिस तसेच राज्य उत्पादन शुल्क विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सहभाग घेतला. अवैध हातभट्टी दारू, बनावट मद्यनिर्मिती, दारू गाळणी केंद्रे आणि अवैध विक्री साखळी यांच्यावर प्रभावी कारवाई करण्यासाठी व्यापक चर्चा करण्यात आली.

बैठकीत अवैध दारू व्यवसायाशी संबंधित माहितीची देवाणघेवाण अधिक वेगाने आणि प्रभावीपणे करण्यावर भर देण्यात आला. तसेच संयुक्त छापेमारी, गुप्त माहिती संकलन, संशयितांवर लक्ष ठेवणे आणि कारवाईची अंमलबजावणी अधिक मजबूत करण्याबाबत निर्णय घेण्यात आले.

विषारी दारू प्रकरणांच्या पार्श्वभूमीवर अवैध दारू निर्मिती व विक्री रोखण्यासाठी पोलिस आणि राज्य उत्पादन शुल्क विभाग यांच्यातील समन्वय अधिक बळकट करण्यात येणार असून, संबंधितांवर कठोर कारवाईचा इशारा देण्यात आला आहे. या बैठकीस पोलिस विभाग आणि राज्य उत्पादन शुल्क विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. अवैध दारूचे संपूर्ण उच्चाटन करून नागरिकांच्या जीविताचे संरक्षण करणे हेच या संयुक्त मोहिमेचे प्रमुख उद्दिष्ट असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले.

## पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात प्रतिबंधात्मक आदेश जारी

पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात शांतता व सुव्यवस्था राखणेकामी पोलीस सह आयुक्त डॉ. शशिकांत महावरकर, यांनी प्राप्त अधिकाराचा वापर करुन व महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन 1951 चे कलम 37 (1) व (3) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करुन पिंपरी – चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात 10 जून 2026 रोजी 00.01 पासून ते 23 जुन 2026 रोजी 24 वाजेपर्यंत खाली नमूद केलेली कृत्य करण्यास या आदेशान्वये मनाई करीत आहे.

कोणताही दाहक पदार्थ अथवा स्फोटक पदार्थ द्रव्य बरोबर नेणे. दगड अथवा शस्त्रे किवा अस्खे सोडावयाची अस्त्रे किंवा फेकावयाची हत्यारे अगर साधने बरोबर नेणे. शस्त्रे, सोटे, भाले, तलवारी, दंड, काठ्या, बंदुका व शारिरीक इजा करण्यासाठी वापरात येईल अशी कोणतीही वस्तू बरोबर नेणे. कोणत्याही इसमाचे चित्राचे प्रतिकात्मक प्रेताचे किंवा पुढा-यांचे चित्राचे प्रतिमेचे प्रदर्शन व दहन करणे. मोठ्याने अर्वाच्य घोषणा देणे, वाद्य वाजविणे. ज्यामुळे सभ्यता अगर नितिमत्ता यास धोका पोहचेल किवा राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा राज्य उलथवून देण्यास प्रवृत्त करेल अशी आवेशपूर्ण भाषणे करणे किवा अविर्भाव करणे कोणतेही जिन्नस तयार करुन त्याचा जनतेत प्रसार करणे. ज्या योगे वरील परिसरात कायदा व सुव्यवस्था धोक्यात येईल अशा पध्दतीने कलम 37(1) व (3) विरुध्द वर्तन करणे. कलम 37 चे पोटकलम (3) अन्वये पाच पेक्षा जास्त लोकांचा जमाव करणे, तसेच पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांचे पुर्व परवानगी शिवाय सभा घेणे किंवा मिरवणुका काढणेस बंदी घालण्यात येत आहे. वरील संपूर्ण आदेश हा शासनाच्या सेवेतील व्यक्तींना व ज्यांना आपल्या वरीष्ठांच्या आदेशानुसार कर्तव्यपुर्तीसाठी हत्यार वाळगणे आवश्यक आहे व त्याबाबत परवानगी आहे त्यांना लागू होणार नाही.

## जैववैद्यकीय कचरा उघड्यावर टाकल्याप्रकरणी महापालिकेची दंडात्मक कारवाई

पिंपरी (दै. संध्या)

उघड्यावर जैववैद्यकीय कचरा टाकून पर्यावरण आणि सार्वजनिक आरोग्याला धोका निर्माण केल्याप्रकरणी पिंपरी चिंचवड महापालिकेच्या 'क' क्षेत्रीय कार्यालयाने संबंधितांवर कठोर कारवाई करत ३५ हजार रुपयांचा दंड वसूल केला.

"क" क्षेत्रीय कार्यालयांतर्गत प्रभाग क्रमांक २ मधील सेक्टर १३, चिखली येथे उघड्यावर जैववैद्यकीय कचरा टाकण्यात आल्याचे निदर्शनास आल्यानंतर ही कारवाई करण्यात आली. जैववैद्यकीय कचऱ्याची अयोग्य विल्हेवाट पर्यावरण प्रदूषणास कारणीभूत ठरत असून नागरिकांच्या आरोग्यालाही गंभीर धोका निर्माण करू शकते. या पार्श्वभूमीवर महापालिकेने तातडीने कारवाई करत संबंधितांवर दंडात्मक कारवाई केली. पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम यांच्या निर्देशानुसार आणि उप आयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल,सहायक आयुक्त किरणकुमार मोरे तसेच क क्षेत्रीय अधिकारी अजिंक्य येळे यांच्या मार्गदर्शनाखाली ही धडक मोहीम राबविण्यात आली. जैववैद्यकीय कचऱ्याची नियमबाह्य विल्हेवाट ही पर्यावरणासह सार्वजनिक आरोग्यासाठी अत्यंत घातक आहे.

तर क्षेत्रीय अधिकारी अजिंक्य येळे म्हणाले की, स्वच्छता आणि सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने जैववैद्यकीय कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावणे बंधनकारक आहे.

नियमभंग करणाऱ्यांवर यापुढेही सातत्याने आणि कठोर कारवाई करण्यात येईल. क क्षेत्रीय कार्यालयाचे सहाय्यक आरोग्य अधिकारी योगेश फल्ले आणि मुख्य आरोग्य निरीक्षक वैभव घोळवे यांच्या नेतृत्वाखाली आरोग्य निरीक्षक राहुल राखपसरे, आरोग्य सहाय्यक अमोल घुसर तसेच महाराष्ट्र सुरक्षा बलाच्या जवानांच्या पथकाने ही कारवाई केली.

## जागतिक पर्यावरण दिनानिमित्त संत निरंकारी मिशनचे लोणावळा–खंडाळा येथे व्यापक वृक्षारोपण व स्वच्छता अभियान संपन्न

पिंपरी (दै. संध्या)

लोणावळा, पिंपरी, ५ जून २०२६: सद्गुरु माता सुदीक्षा जी महाराज यांच्या पावन प्रेरणा आणि दिव्य आशीर्वादाने संत निरंकारी मिशनची सामाजिक शाखा संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशन यांच्या वतीने ५ जून रोजी सकाळी ९.०० ते दुपारी २.०० या वेळेत 'जागतिक पर्यावरण दिना'निमित्त महाराष्ट्रातील खंडाळा, लोणावळा, महाबळेश्वर, पाचगणी, पन्हाळा आणि सोमेश्वर यांसह देशभरातील १८ प्रमुख पर्वतीय व पर्यटनस्थळांवर वृक्षारोपण व स्वच्छता अभियान संपन्न झाले.



लोणावळा आणि खंडाळा येथे सकाळी ९ वाजल्यापासून निरंकारी मिशनतर्फे लोणावळा नगरपरिषदेच्या सहकार्याने भव्य वृक्षारोपण तसेच स्वच्छता अभियान राबविण्यात आले. लोणावळा–खंडाळा परिसरातील खंडाळा ते अमृतांजन पॉईंट, वलवन तळे, कावेरी फार्म, नागरगाव, लोहगड उद्यान, रायवूड ते लोणावळा धरण गेट, आय.एन.एस. ते भुशी, तुंगार्ली चौक ते ग्रामीण पोलीस स्टेशन, नगरपरिषद कार्यालय तसेच मावळा पुतळा या ठिकाणांचा या अभियानात समावेश होता.

या कार्यक्रमाला लोणावळा नगरपरिषदेचे नगराध्यक्ष श्री. राजेंद्र सोनवणे तसेच सर्व नगरसेवक, पदाधिकारी आणि संत निरंकारी मिशनचे पदाधिकारी उपस्थित होते.

संयुक्त राष्ट्र संघाच्या 'Beat Plastic Pollution' या संकल्पनेला अनुसरून आयोजित करण्यात आलेला हा उपक्रम केवळ पर्यावरण संवर्धनापुरता मर्यादित नसून "सेवा, सुमिरण आणि सद्भाव" या तत्त्वांद्वारे निसर्गसंरक्षणाची एक आध्यात्मिक साधना म्हणून साकारला जात आहे.

या अभियानात मिशनचे स्वयंसेवक, सेवादल सदस्य, श्रद्धाळू आणि स्थानिक नागरिकांनी हजारोंच्या संख्येने उत्स्फूर्त सहभाग घेत वृक्षारोपण, स्वच्छता मोहीम, पथनाट्ये आणि विविध जनजागृती उपक्रमांद्वारे पर्यावरण संवर्धनाचा संदेश समाजापर्यंत पोहोचवला. पर्यावरणविषयक संदेश असलेले फलक, मानवी साखळी आणि जनसंपर्क उपक्रमांद्वारे "निसर्गाची सेवा हीच प्रभूसेवा" हा संदेश जनमानसात रुजविण्यात आला.

संत निरंकारी मिशनचे पुणे झोनल प्रभारी आदरणीय श्री. अशोक अहुजा यांनी माहिती देताना सांगितले की, संत निरंकारी मिशन २०१४ पासून संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रमाच्या संकल्पनेनुसार 'जागतिक पर्यावरण दिन' सेवा, जनजागृती आणि लोककल्याणाच्या माध्यमातून सातत्याने साजरा करीत आहे.

आज जेव्हा संपूर्ण जग पर्यावरण संरक्षणासाठी जागरूक होऊन सकारात्मक पावले उचलत आहे, अशा वेळी संत निरंकारी मिशन आपल्या सेवा मूल्यांच्या माध्यमातून समाजात, विशेषतः युवा पिढीमध्ये हा संदेश अधिक दृढ करत आहे की स्वच्छता केवळ बाह्य वातावरणाची नसून विचारांची, संस्कारांची आणि जीवनशैलीची असली पाहिजे. "निसर्गाची सेवा हीच प्रभूसेवा" या भावनेतून राबविण्यात येणारे हे अभियान स्वच्छ, सुरक्षित आणि हरित भविष्यासाठी एक महत्त्वपूर्ण योगदान ठरत आहे.

# ताथवडेत दहा लाख झाडे लावण्याचा संकल्प

## ६५ हजार क्यूसेक कार्बन कमी होणार; खासदार श्रीरंग बारणे यांची माहिती

पिंपरी (दै. संध्या)

खासदार श्रीरंग बारणे आणि शिवसेना गटनेते विश्वजित बारणे यांच्या सहकार्यातून ताथवडे येथे वनराई उभारण्यात येत आहे. येथे आतापर्यंत आठ लाख देशी झाडे लावली आहेत. दहा लाख झाडे लावण्याचा संकल्प करण्यात आला आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात झाडे लावल्यानंतर भविष्यात ६५ हजार क्यूसेक कार्बन कमी होईल, असा विश्वास खासदार बारणे यांनी व्यक्त केला.

'जागतिक पर्यावरण दिना'चे औचित्य साधून शासकीय पशु पैदास प्रक्षेत्र, ताथवडे येथे 'ओरिएअर्थ निसर्ग फाउंडेशन'च्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या वृक्षारोपण सोहळ्याला खासदार बारणे यांची प्रमुख उपस्थिती होती. युवासेना पश्चिम महाराष्ट्र सचिव तथा नगरसेवक विश्वजीत बारणे, शिवसेना वैद्यकीय कक्ष पिंपरी-चिंचवड शहरप्रमुख श्रीकांत नवले, शासकीय पशु पैदास प्रक्षेत्र ताथवडेचे सहाय्यक आयुक्त उपेंद्र गायकवाड, प्रशासन अधिकारी दैवशाली चव्हाण, कृषी अधिकारी राजवर्धन घोगरे, कुंदन हुंडाईचे एमडी हितेश चड्डा, ओरिएअर्थ निसर्ग फाउंडेशनचे अध्यक्ष जीवन शेवाळे, डॉ. विनायक चौव्हाण, सी आर रामास्वामी, अक्षय मोहोळकर, आदित्य इंगळे आणि रेवन काकडे उपस्थित होते. 'ओरिएअर्थ निसर्ग फाउंडेशन'ने पाच वर्षे झाडे जगवण्याची जबाबदारी घेतली आहे.



खासदार श्रीरंग बारणे म्हणाले, आठ लाख झाडांची लागवड केली आहे. कुंदन हुंडाईच्या सीएसआर फंडातून झाडांची लागवड केली आहे. दहा लाख झाडे लावण्याचा संकल्प करण्यात आला आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात झाडे लावल्याने ६५ हजार क्यूसेक कार्बन कमी होईल.

कार्बन कमी करणारी देशी जातीची झाडे आहेत. महापालिकेची शहरात २०३ उद्याने आहेत. या उद्यानात मोठ्या प्रमाणात झाडे लावली आहेत. ही झाडे जगवण्याची जबाबदारी महापालिकेची आहे. झाडांची केवळ लागवड करणे पुरेसे नाही, तर त्यांची योग्य निगा राखणे आणि त्यांना जगविणे हे प्रशासनाबरोबरच प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे.

पर्यावरणाचे रक्षण ही एका दिवसाची जबाबदारी नसून ती आपल्या जीवनशैलीचा भाग असायला हवी. सर्वांनी पृथ्वीला अधिक हिरवेगार बनवण्याचा निश्चय करावा. वाढत्या शहरीकरणात निसर्गाचा समतोल राखण्यासाठी केवळ झाडे लावणे नव्हे, तर त्यांचे संवर्धन करणे ही काळाची गरज आहे, असे नगरसेवक विश्वजीत बारणे म्हणाले.

### शहर प्लास्टिकमुक्त करण्याचा संकल्प

सामाजिक बांधिलकीतून शहर स्वच्छ ठेवणे, कचरा न करणे आणि पर्यावरण संवर्धनात सक्रिय सहभाग घेणे ही आपली सामूहिक जबाबदारी देखील आहे. ग्लोबल वार्मिंगचे मोठे संकट आहे. हवा, पाणी प्रदूषण वाढत आहे. हे टाळने नागरिकांच्या हातात आहे. प्लास्टिकमुक्त शहर व्हावे अशी इच्छा आहे. शहरातून वाहणारी पवना, इंद्रायणी नदी स्वच्छ व्हावी. नागरिकांना स्वच्छ पाणी मिळावे. शहर प्रदूषण मुक्त करण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन पुढाकार घ्यावा, असे आवाहन खासदार बारणे यांनी केले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



## जागतिक पर्यावरण दिनानिमित्त इनोसन्ट टाईम्स स्कूल वतीने वृक्षारोपण

कोरेगावमुळ (दैनिक संध्या) : जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून इनोसन्ट टाईम्स स्कूल यांच्या वतीने वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. वाढते प्रदूषण आणि पर्यावरणासमोरील आव्हाने लक्षात घेता समाजात पर्यावरणाबाबत जनजागृती निर्माण करणे तसेच वृक्षारोपण व वृक्षसंवर्धनासाठी प्रेरणा देणे हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या प्राचार्या डॉ. अंकिता संघवी उपस्थित होत्या. त्यांच्या हस्ते वृक्षारोपण करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी उपस्थित शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व विशद केले. 'वृक्ष हे पृथ्वीचे खरे जीवनदाता असून पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी प्रत्येकाने वृक्षारोपण करुन त्यांचे संवर्धन करणे ही काळाची गरज आहे,' असे मत त्यांनी व्यक्त केले. या उपक्रमाचे नियोजन वनराई इको क्लबचे शिक्षक तथा आंतरराष्ट्रीय खेळाडू धनंजय मदने यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षक व सर्व कर्मचाऱ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवून परिश्रम घेतले. जागतिक पर्यावरण दिनानिमित्त आयोजित या उपक्रमामुळे पर्यावरण संरक्षणाचा संदेश समाजापर्यंत पोहोचला असून वृक्षसंवर्धनासाठी जनजागृती होण्यास मदत झाली आहे.




## चाकणला माझे वृक्ष माझी जबाबदारी अभियान दिमाखात संपन्न

चाकण (दैनिक संध्या) : जागतिक पर्यावरण दिनानिमित्त चाकण नगर परिषदेतर्फे राबविण्यात आलेल्या माझे वृक्ष माझी जबाबदारी या अभियानाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. यावेळी पर्यावरण संवर्धनाचा संकल्प करत प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये वृक्षारोपण करण्यात आले. नागरिकांना यावेळी मोफत झाडे आणि कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले. पर्यावरण संवर्धनाबरोबरच प्लास्टिकमुक्त चाकण घडविण्याचा संदेश यावेळी देण्यात आला. विशेष म्हणजे वन विभाग व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य तथा चाकण नगरपरिषदेचे शिवसेना गटनेते नितीन गोरे यांच्या संयुक्त विद्यमाने तब्बल दोन हजार झाडांचे मोफत वाटप करण्यात आले. नागरिकांनी मोठ्या उत्साहाने झाडे स्वीकारून त्यांचे संगोपन करण्याचा निर्धार व्यक्त केला. यावेळी चाकण नगरपरिषदेचे मुख्याधिकारी डॉ. अंकुश जाधव, नगराध्यक्षा मनिषा गोरे, उपनगराध्यक्षा सुवर्णा राक्षे, नगरसेवक मंगेश कांडगे, ॲड. प्रकाश गोरे, स्वाती लेंडघर, पुनम शेवकरी, जयश्री नायकवाडी, रूपाली कांडगे, आरती परदेशी, हर्षद लेंडघर आदी उपस्थित होते. नितीन गोरे यावेळी म्हणाले," वृक्षारोपण हा केवळ एक दिवसाचा कार्यक्रम नसून भावी पिढ्यांसाठी सुरक्षित आणि समृद्ध पर्यावरण निर्माण करण्याची चळवळ आहे. आपण लावलेले प्रत्येक झाड हे आपल्या मुलांच्या भविष्याची गुंतवणूक आहे. माझे वृक्ष माझी जबाबदारी ही भावना प्रत्येकाच्या मनात रुजली पाहिजे. तसेच एक झाड आईसाठी या उपक्रमातून प्रत्येकाने आपल्या आईच्या नावाने एक झाड लावून त्याचे जतन करण्याचा संकल्प करावा."

## पोलीस निरीक्षक जितेंद्र कदम यांचा गौरव

चाकण (दैनिक संध्या) : कर्तव्यात कसूर न करता सदरक्षणाय खलनिग्रहणाय हे ब्रिद सत्यात उतरवणारे येथील चाकण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र कदम यांचा श्री भैरवनाथ देवस्थान ट्रस्ट व समस्त ग्रामस्थ मंडळी चाकण यांच्या वतीने गौरव करण्यात आला. श्री भैरवनाथ महाराजांच्या यात्रेत चाकण शहरात येथील पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र कदम व त्यांच्या सहकाऱ्यांनी चोख व कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवला होता. कोणताही अनुचित प्रकार न घडता यात्रा निर्विघ्नपणे पार पडली. कदम व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांचा सन्मान व्हावा यासाठी ट्रस्टच्या वतीने त्यांचा येथील भैरवनाथ मंदिरात गौरव करण्यात आला. श्री भैरवनाथ देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष किसन गोरे व उद्योजक ध्रुवशेठ कानपिळे यांच्या हस्ते कदम यांना शाल, श्रीफळ, मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले. याप्रसंगी पोलीस जवान दत्तात्रय टोके, भैरोबा यादव, अर्जुन धाडगे, संजय गोरे, सुनील शेलार, रमेश कांडगे, रमेश गोरे, भरत गोरे, चंद्रकांत गोरे आदी उपस्थित होते. पोलीस निरीक्षक जितेंद्र कदम यावेळी म्हणाले," यात्रा काळात शहरात बंदोबस्त ठेवणे ही आमची प्राथमिक जबाबदारी होती. यात्रा उत्साहात संपन्न झाल्याने याचे आम्हांला समाधान वाटते. सत्काराने प्रेरणा मिळते. चाकणकरांनी केलेला गौरव नेहमी आठवणीत राहील." किसन गोरे यांनी सर्वांचे आभार मानले.



# नारायणगाव महाविद्यालय जागतिक पर्यावरण दिवस साजरा

नारायणगाव (दै. संध्या)






ग्रामोन्नती मंडळ कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय जागतिक पर्यावरण दिवस (world environment day) या कार्यक्रमांमध्ये राष्ट्रीय छात्र सैनिकांनी सहभाग नोंदवला व झाडांचे संगोपन व लागवड केली. यावेळी प्राचार्य डॉक्टर आनंद कुलकर्णी वनस्पतीशास्त्र प्रमुख डॉ. अशोक कानडे, प्रा.मयुरी वाजगे आणि सोबतच राष्ट्रीय छात्र सेनेचे एकुण ६० कॅडेट उपस्थित झाले.

जागतिक पर्यावरण दिवसाची माहिती डॉ.कॅप्टन दिलीप शिवणे सरांनी दिली, प्रमुख वक्ते प्रा. डॉ.अशोक कानडे सर ह्यांनी जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने देशी आणि विदेशी झाडांच्या गुणधर्माविषयी देशी झाडे कोणती व किती असतात त्यांचे गुणधर्म विदेशी झाडांचे गुणधर्म व त्यांचा कशा प्रकारे आपण विविध उपयोग करू शकतो हे देखील समजाऊन सांगितले. प्रो.डॉ.अशोक कानडे ह्यांनी सर्व कॅडेट्स ला खूप चांगल्या प्रकारे सर्व झाडांची माहिती सांगितली त्यांच्या माहितीतून आम्हाला बऱ्याच झाडांची माहिती मिळाली.

जागतिक पर्यावरण दिन दरवर्षी ५ जून रोजी साजरा केला जातो. याचा उद्देश म्हणजे लोकांमध्ये पर्यावरणाविषयी जागरूकता निर्माण करणे आणि निसर्गाचे रक्षण करण्यासाठी कृतीशील होणे.जागतिक पर्यावरण दिन दरवर्षी जगभर ५ जून रोजी साजरा केला जातो या पर्यावरणाच्या रक्षणासाठी जागरूकता आणि कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी संयुक्त राष्ट्राचे प्रमुख साधन आहे. जागतिक पर्यावरण दिनाची स्थापना १९७२ मध्ये संयुक्त राष्ट्रांनी स्टॉकहोम कॉन्फरन्स ऑन द ह्यूमन एन्व्हायर्नमेंट (५ जून १९७२) येथे केली, ज्याचा परिणाम मानवी संवाद आणि पर्यावरणाच्या एकात्मतेवर झालेल्या चर्चेतून झाला होता. दोन वर्षांनंतर, १९७४ मध्ये "फक्त एक पृथ्वी" या थीमसह पहिला जागतिक पर्यावरण दिन आयोजित करण्यात आला.

सन १९७३ मध्ये पहिल्यांदा जागतिक पर्यावरण दिन साजरा करण्यात आला जागतिक पर्यावरण दिन साजरा करण्याचे प्रमुख उद्देश म्हणजेच परिसंस्थेचा ऱ्हास थांबवणे आणि जागतिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी त्यांना जोपासणे होय. पर्यावरणाची गुणवत्ता वाढवणे समस्या व संवर्धनाविषयी जनजागृती निर्माण करणे आणि पर्यावरण विषयक निर्णय घेण्याची क्षमता निर्माण व्हावी म्हणून ५ जून हा दिवस जागतिक पर्यावरण दिन म्हणून साजरा केला जातो.सागरी प्रदूषण, जास्त लोकसंख्या, ग्लोबल वॉर्मिंग, शाश्वत उपभोग आणि वन्यजीव गुन्हेगारी यांसारख्या पर्यावरणीय समस्यांवर जागरूकता निर्माण करण्यासाठी एक व्यासपीठ आहे.

जागतिक पर्यावरण दिन हा सार्वजनिक पोहोचण्यासाठी एक जागतिक व्यासपीठ आहे, ज्यामध्ये दरवर्षी १४३ हून अधिक देशांचा सहभाग असतो. दरवर्षी, कार्यक्रमाने व्यवसाय, गैर-सरकारी संस्था, समुदाय, सरकार आणि ख्यातनाम व्यक्तींना पर्यावरणीय कारणांचे समर्थन करण्यासाठी एक थीम आणि मंच प्रदान केला आहे. या कार्यक्रमाप्रसंगी विविध रोपे लावण्यात आली यामध्ये विविध प्रकारच्या देशी विदेशी झाडांची रोपे लावण्यात आली.

या सर्व कार्यक्रमाचे नियोजन आणि सूत्रसंचालन हे कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय नारायणगाव यांचे राष्ट्रीय छात्र सेनेचे प्रमुख आणि मानसशास्त्र विभाग प्रमुख डॉक्टर कॅप्टन दिलीप शिवणे सर यांनी केले आणि कॅडेट वैष्णवी थोरात हिने "पर्यावरण वाचवूया, आपले भविष्य सुरक्षित करूया!" अशी घोषणा देत कार्यक्रमासाठी उपस्थित पाहुण्यांचे आभार मानले.

# आनंदवन आणि युथ ट्रान्सफॉर्मेशन फोरम संस्थेच्या वतीने ७०० वृक्षांचे रोपण

लोणी काळभोर (दै. संध्या)

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून 5 जून 2026 रोजी युथ ट्रान्सफॉर्मेशन फोरम आणि आनंदवन फौंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने हडपसर-महंमदवाडी परिसरातील आनंदवन फेज 5 (औतडवाडी हांडेवाडी) आणि न्याती काउंटी येथे भव्य वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

सकाळी 7 ते 11 या वेळेत पार पडलेल्या या मोहिमेत निसर्गप्रेमींनी आणि विविध शाळांतील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले महाराष्ट्र वन विभागाचे फॉरेस्ट कॉन्झर्व्हेटर आशिष ठाकरे यांनी सांगितले की, 'झपाट्याने होणारे शहरीकरण आणि जागतिक तापमान वाढ या संकटांना तोंड देण्यासाठी अशा प्रकारे मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करणे ही काळाची गरज आहे. लोक सहभाग वाढवण्याची आवश्यकता आहे.'

सध्या जगभरात भेडसावणारी जागतिक तापमान वाढ (ग्लोबल वॉर्मिंग), सातत्याने वाढणारा उन्हाचा कडाका आणि दुर्मिळ होत चाललेल्या वनौषधींचा ऱ्हास या पार्श्वभूमीवर, आपले सामाजिक दायित्व म्हणून या समस्येविरोधात लढण्यासाठी या भव्य मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात साधारण 700 वृक्षांची लागवड करण्यात आली असून, केवळ वृक्षारोपण न करता पुढील 3 वर्षे या वृक्षांचे संवर्धन आणि जोपासना केली जाणार आहे, अशी माहिती युथ ट्रान्सफॉर्मेशन फोरमचे अध्यक्ष डॉ. विक्रम गायकवाड यांनी दिली.



कार्यक्रमादरम्यान आनंदवन संस्थेचे विशाल पवार यांनी संस्थेच्या कार्याचा आढावा घेत आनंदवन फेज 1 पासून फेज 7 पर्यंत झालेल्या विस्ताराची सविस्तर माहिती दिली. तसेच, युथ ट्रान्सफॉर्मेशन फोरमच्या डॉ. सोनल भालेराव यांनी संस्थेच्या कार्याची माहिती देताना सांगितले की, संस्था गेली तीन वर्षे कळसुबाईच्या पायथ्याशी वृक्षारोपण व त्यांचे संवर्धन करत आहे आणि याच उपक्रमाचा भाग म्हणून यावर्षी आनंदवन फेज 5 मध्ये ही मोहीम घेण्यात आली. हा जागतिक पर्यावरण दिनाचा कार्यक्रम केवळ एक शासकीय सोहळा नसून, समाजाच्या हितासाठी चालवला जाणारा एक लोककल्याणकारी कार्यक्रम आहे असे नमूद केले.

याप्रसंगी आनंदवन संस्थेचे प्रवीण कुमार आनंद, रमेश नऱ्यानी, भूपेश शर्मा, तसेच युथ ट्रान्सफॉर्मेशन फोरमचे डॉ.समीर ननावरे, डॉ.पुस्तके, डॉ.पाटील, डॉ.वाळके आदि मान्यवर उपस्थित होते. इंडियन डायस्पोराचे रजत कुमार आणि झेंटिव्हाचे पुरोहित यांच्यासह दिल्ली पब्लिक स्कूल, अमानोरा स्कूल, रेहान स्कूल, डी.पी.एस. स्कूल आणि ग्रेस स्कूलचे विद्यार्थी मोठ्या संख्येने या मोहिमेत सहभागी झाले होते. याशिवाय, नोबेल हॉस्पिटलचे मुख्य अधिकारी डॉ. संजय पठारे, हेल्थ केअर असोसिएशनचे धनंजय कणसे, सिद्धू चव्हाण, हृषीकेश शेळके, डॉ. भूषण केदारी, अडसूळ, संघर्ष अकॅडमी (उरूळी कांचन) व वेलफेअर असोसिएशनचे संचालक आणि शेकडो निसर्गप्रेमी नागरिक या पर्यावरण पूरक उपक्रमात हिरीरीने सहभागी झाले होते.

## माऊली सेवा प्रतिष्ठानतर्फे दुर्गम भागातील गरजू नागरिकांना कपड्यांचे वाटप

राजगुरुनगर (दै. संध्या)




राजगुरुनगर येथील माऊली सेवा प्रतिष्ठानच्या वतीने खेड तालुक्यातील दुर्गम भागातील गरजू नागरिकांना कपड्यांचे वाटप करण्यात आले. सामाजिक बांधिलकी जपत प्रतिष्ठानने राबविलेल्या या उपक्रमाला नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. गोरगरिबांच्या मदतीसाठी नेहमीच अग्रेसर असलेल्या माऊली सेवा प्रतिष्ठानने गेल्या चार वर्षांपासून समाजातील गरीब व दुर्बल घटकांसाठी विविध समाजोपयोगी उपक्रम राबविले आहेत. या अंतर्गत शहरातील नागरिकांकडून जुने परंतु वापरण्यायोग्य कपडे संकलित करण्यात येतात. त्यानंतर कपड्यांची वर्गवारी करून गरजूंना त्यांचे वाटप केले जाते.

गेल्या दीड महिन्यात जमा झालेल्या सुमारे ३० पोती कपड्यांचे नुकतेच खेड तालुक्यातील शिरगावजवळील कातकरी वस्ती, विठ्ठलवाडी तसेच टोकावडेजवळील कातकरी भिसे वस्ती येथील नागरिकांना वितरण करण्यात आले. या उपक्रमाचा परिसरातील १५० हून अधिक नागरिकांनी लाभ घेतला. या उपक्रमाबद्दल लाभार्थी नागरिकांनी माऊली सेवा प्रतिष्ठानचे आभार मानत समाधान व्यक्त केले. समाजातील गरजूंपर्यंत मदतीचा हात पोहोचविण्याचे कार्य यापुढेही सुरू ठेवणार असल्याची भावना प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

## धनकवडीतील त्या धोकादायक चेंबरची अखेर दुरुस्ती; युवा क्रांती संघटनेच्या वर्षा नाईक यांच्या पाठपुराव्यास यश

कवठे येमाई (दै. संध्या)

पुण्याच्या धनकवडी परिसरातील पुण्याई नगर जवळील रुबी बेकारी नजीक नागरिकांसाठी धोकादायक ठरत असलेल्या मोठ्या चेंबरची अखेर दुरुस्ती करण्यात आली असून यामुळे परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. युवा क्रांती पोलीस मित्र संघटनेच्या राष्ट्रीय महिला सह संपर्क प्रमुख व ज्येष्ठ समाजसेविका श्रीमती वर्षाताई नाईक यांनी या प्रश्नी सातत्याने केलेल्या पाठपुराव्याला अखेर यश मिळाले आहे.त्यामुळे श्रीमती वर्षाताई नाईक यांचे अभिनंदन होत आहे.

सदर चेंबर अनेक दिवसांपासून धोकादायक अवस्थेत होते. त्यामुळे पादचारी, दुचाकीस्वार तसेच लहान मुलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला होता.विशेषतः पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर मोठा अपघात होण्याची भीती नागरिकांकडून व्यक्त केली जात होती.या चेंबर जवळूनच खोलवर ओढा देखील असल्याची माहिती श्रीमती नाईक यांनी दिली होती.

या गंभीर समस्येबाबत विविध दैनिकातून देखील सातत्याने आवाज उठवून प्रशासनाचे लक्ष वेधले होते.ज्येष्ठ समाजसेविका श्रीमती वर्षाताई नाईक यांनी संबंधित विभागाकडे वारंवार पाठपुरावा करत नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न लावून धरला होता. त्यांच्या प्रयत्नांमुळे आणि वृत्तपत्र व समाज माध्यमांच्या पाठपुराव्यामुळे प्रशासनाने तातडीने दखल घेत चेंबरची दुरुस्ती पूर्ण केली.

पावसाळ्यापूर्वीच दुरुस्तीचे काम पूर्ण झाल्याने पुण्याई नगर, धनकवडी परिसरातील नागरिकांमधून समाधान व्यक्त केले जात असून वर्षाताई नाईक यांचे अभिनंदन केले जात आहे. नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी त्यांनी केलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे परिसरातून कौतुक होत आहे.नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने वेळेत झालेली ही दुरुस्ती महत्त्वाची ठरली असून भविष्यातही अशा समस्या तातडीने मार्गी लावण्यासाठी प्रशासनाने अधिक संवेदनशीलपणे काम करण्याची अपेक्षा परिसरातील नागरिकांनी व्यक्त केली आहे.

# तहसीलदार प्रशांत बेडसे यांना दिलासा

## उच्च न्यायालयाकडून एफआयआर आदेशाला स्थगिती

राजगुरुनगर (दै. संध्या)

शासकीय कर्तव्य बजावत असताना प्रामाणिक अधिकाऱ्यांना विनाकारण वेठीस धरणाऱ्या आणि खोटे गुन्हे दाखल करणाऱ्या प्रवृत्तींना खेडचे तहसीलदार प्रशांत बेडसे यांनी उच्च न्यायालयाच्या माध्यमातून एक सणसणीत कायदेशीर चपराक लगावली आहे.

मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने शनिवारी (दि.६ ) सुट्टीचा दिवस असूनही या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून विशेष 'तातडीची सुनावणी' घेतली. न्यायमूर्ती प्रफुल्ल एस. खुबळकर यांच्या खंडपीठाने वरोरा दंडाधिकारी न्यायालयाने अधिकाऱ्यांवर एफआयआर दाखल करण्यासाठी दिलेल्या एकतर्फी आदेशाला तत्काळ स्थगिती दिली आहे.

या निकालामुळे तहसीलदार प्रशांत बेडसे यांच्यासह अनेक प्रामाणिक अधिकाऱ्यांना मोठे संरक्षण मिळाले असून, विनाकारण त्रास देणाऱ्या प्रवृत्तींना भक्कम जरब बसली आहे. वरोरा येथील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग (JMFC) यांनी ०४ जून २०२६ रोजी भारतीय न्याय संहितेच्या (BNS) कलम ६१(२), १९९, ३१६(५) आणि ३१८(४) अंतर्गत अनेक सरकारी अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले होते. या अन्यायकारक आदेशाविरुद्ध तहसीलदार प्रशांत बेडसे (खेड) आणि तहसीलदार अविनाश शेंबटवाड (गडचिरोली) यांनी अत्यंत तत्परतेने उच्च न्यायालयात दाद मागितली. उच्च न्यायालयाने आपल्या आदेशात दंडाधिकारी न्यायालयाच्या कार्यपद्धतीवर अत्यंत गंभीर निरीक्षणे नोंदवली आहेत.



उच्च न्यायालयाने स्पष्ट केले की, मूळ तक्रारदाराने केवळ 'मोघम आरोप' केले होते आणि कोणतेही बनावट दस्तऐवज सादर केले नसल्याचे खुद्द दंडाधिकाऱ्यांनी मान्य करूनही अधिकाऱ्यांवर थेट एफआयआरचे आदेश दिले.

याशिवाय या प्रकरणात कोणतेही अधिकारक्षेत्र नसताना आणि शासनाची पूर्वपरवानगी नसताना हे आदेश पारित करण्यात आले होते. हा तहसीलदार बेडसे यांच्या वकिलांचा युक्तिवाद न्यायालयाने ग्राह्य मानला. या बेकायदेशीर आदेशामुळे अधिकाऱ्यांच्या सेवेवर आणि कारकिर्दीवर गंभीर परिणाम होऊ शकतो, याची दखल घेत उच्च न्यायालयाने हा आदेश वरवर पाहताच 'असमर्थनीय' असल्याचे स्पष्ट केले.

या सुनावणीचे सर्वात मोठे यश म्हणजे, उच्च न्यायालयाने केवळ याचिकाकर्त्यांनाच नव्हे, तर ज्या सर्व सरकारी अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले होते, त्या सर्वांच्या कारवाईला 'अंतरिम दिलासा' देत स्थगिती दिली आहे. तहसीलदार प्रशांत बेडसे यांच्या या आक्रमक, धडाडीच्या आणि 'दबंग' भूमिकेमुळे संपूर्ण महसूल आणि प्रशासकीय वर्तुळातून त्यांचे मोठे कौतुक होत आहे.

या ऐतिहासिक निकालामुळे, माहिती अधिकाराचा (RTI) गैरवापर करून ब्लॅकमेल करणारे तोतया कार्यकर्ते, खोटे व्हिसल-ब्लोअर आणि प्रशासनाला वेठीस धरणाऱ्या भुरट्या तक्रारदारांचे धाबे दणाणले आहेत. "प्रामाणिकपणे काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना खोट्या गुन्ह्यांची भीती दाखवून नामोहरम करता येणार नाही.




दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक

# शाश्वत भविष्यासाठी पर्यावरण संवर्धन ही काळाची गरज

## राज्यपाल जिष्णु देव वर्मा : 'नमस्कार भूमी २' या पर्यावरण जनजागृती उपक्रमाचा शुभारंभ

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या चित्रफितीद्वारे शुभेच्छा

■ मुंबई (दै. संध्या)

जागतिक पर्यावरण दिन २०२६ निमित्त वांद्रे येथील कार्टर रोड ॲम्फीथिएटर येथे आयोजित विशेष कार्यक्रमात राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी पर्यावरण संवर्धनासाठी सामूहिक जनसहभागाचे महत्त्व अधोरेखित करत, 'आजच्या काळात पर्यावरण आणि विकास हे परस्परविरोधी नसून पर्यावरण म्हणजेच विकास आहे,' असे प्रतिपादन केले. आपल्या भाषणात राज्यपाल वर्मा म्हणाले की, त्यांनी सार्वजनिक जीवनाची सुरुवात पर्यावरणवादी कार्यकर्ता म्हणून केली असून ईशान्य भारतातील संस्कृतीत 'प्रकृती देवो भव' ही भावना खोलवर रुजलेली आहे. निसर्ग हा दैवी अंश असलेला असून त्याचे संरक्षण करणे ही प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे, असे त्यांनी सांगितले.

पूर्वी 'पर्यावरण की विकास' हा चर्चेचा विषय होता. मात्र आज शाश्वत विकासाची संकल्पना जगभर स्वीकारली जात असून पर्यावरण संरक्षणाशिवाय विकासाची कल्पनाच करता येत नाही. पर्यावरणीय असंतुलनाचा सर्वाधिक फटका समाजातील गरीब आणि दुर्बल घटकांना बसतो. त्यामुळे पर्यावरण संवर्धन ही केवळ नैसर्गिक साधनसंपत्ती जपण्याची बाब नसून सामाजिक न्यायाची आहे, असे राज्यपालांनी नमूद केले.

भारतीय संस्कृती आणि परंपरेत निसर्गाशी सुसंवादाला विशेष महत्त्व देण्यात आले आहे. 'वनस्पतये शांती' सारख्या प्रार्थनांमधून निसर्गातील शांतता आणि मानवी जीवनातील समृद्धी यांचे नाते अधोरेखित करण्यात आले आहे. निसर्गाचे अतिरेकी शोषण केल्यास त्याचे दुष्परिणाम मानवजातीलाच भोगावे लागतात, याची जाणीव प्रत्येकाने ठेवली पाहिजे, असे ते म्हणाले.

पर्यावरण विषय केवळ चर्चासत्रे आणि परिसंवादांपुरता मर्यादित न ठेवता तो कृतीत उतरविण्याचे आवाहन करताना राज्यपालांनी पर्यावरण संवर्धनाकडे राष्ट्रसेवा आणि भावी पिढ्यांच्या सुरक्षित भविष्याच्या दृष्टीने पाहण्याची गरज व्यक्त केली. नैसर्गिक साधनसंपत्ती ही मानवजातीची सामायिक संपत्ती असून तिचे जतन आणि संवर्धन करणे हे कर्तव्य असल्याचे त्यांनी सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चित्रफितीद्वारे शुभेच्छा संदेश देताना पर्यावरण संरक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. ते म्हणाले की, मानवजातीच्या शाश्वत भविष्यासाठी पर्यावरणाचे संवर्धन आणि संरक्षण अत्यंत आवश्यक आहे. पर्यावरणाबाबत जनजागृती निर्माण करण्यासाठी भामला फाउंडेशनतर्फे दरवर्षी विविध उपक्रम आणि अभियानांचे आयोजन केले जाते, ही अत्यंत स्तुत्य बाब आहे. या उपक्रमांमुळे नागरिकांमध्ये पर्यावरणाविषयी जागरूकता वाढून निसर्ग संवर्धनासाठी सकारात्मक कृती करण्याची प्रेरणा मिळते. प्रत्येक नागरिकाने या अभियानात सक्रिय सहभाग नोंदवून वृक्षसंवर्धन, प्रदूषण नियंत्रण आणि नैसर्गिक संसाधनांच्या जतनासाठी योगदान द्यावे, असे आवाहनही त्यांनी केले.




पर्यावरण रक्षण ही केवळ शासनाची नव्हे तर प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमादरम्यान राज्यपालांच्या हस्ते 'नमस्कार भूमी २' या पर्यावरण जनजागृती उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला तसेच त्यासाठी तयार करण्यात आलेल्या प्रेरणा गीताचे अनावरण करण्यात आले. यावेळी राज्यपालांनी 'भावना फाउंडेशन'तर्फे तयार करण्यात आलेल्या 'भूमी नमस्कार' या प्रेरणादायी गीताचे विशेष कौतुक केले. हे गीत पर्यावरण संरक्षणाचा प्रभावी संदेश देणारे असून व्यापक जनजागृतीसाठी महत्त्वपूर्ण ठरेल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

प्लास्टिक प्रदूषणमुक्त आणि पर्यावरणपूरक जीवनशैलीचा संदेश यावेळी उपस्थितांना देण्यात आला. पर्यावरण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांचा यावेळी गौरव करण्यात आला.

आमदार सचिन अहिर, महाराणा प्रताप यांचे वंशज मेवाडचे श्रीजी लक्षप्रताप महाराज, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे उपाध्यक्ष व कार्यकारी संचालक अनिल गायकवाड, राज्यपालांचे सहसचिव एस. राममूर्ती, गौर गोपाल दास अभिनेते सोनू सूद, गायक शंकर महादेवन, अभिनेत्री मलायका अरोरा, रूपा गांगुली, गायक बादशाह, संगीतकार हिमेश रेशमिया, गायिका नेहा कक्कर, सीमा सिंग, विजय कारिया तसेच भामला फाउंडेशनचे संस्थापक आसिफ भामला यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

## थोडक्यात पण महत्वाचे



### टाटा समूहाच्या अधिकाऱ्यांची सदिच्छा भेट

मुंबई (दैनिक संध्या) : व्हेनेझुएलाच्या बोलिव्हियन प्रजासत्ताकाच्या कार्यवाहक राष्ट्राध्यक्षा डेल्सी रॉड्रिग्ज यांनी बॉम्बे हाऊस येथे टाटा समूहाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची सदिच्छा भेट घेतली. राष्ट्राध्यक्षा डेल्सी रॉड्रिग्ज यांनी बॉम्बे हाऊस येथे टाटा मोटर्सच्या नवीन ईलेक्ट्रिक वाहनांची पाहणी करुन माहिती घेतली. टाटा समूहाच्या वतीने टाटा मोटर्सचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी गिरीश वाघ, तसेच वरिष्ठ अधिकारी यांनी राष्ट्राध्यक्षा डेल्सी रॉड्रिग्ज यांचे स्वागत केले. यावेळी राष्ट्राध्यक्षा डेल्सी रॉड्रिग्ज यांनी इलेक्ट्रिक वाहनांच्या क्षेत्रातील आधुनिक आणि प्रगत तंत्रज्ञानाबाबत तसेच या क्षेत्रातील नवीन संधींबाबत टाटा समूहाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा केली. टाटा एक्स्पिरिएंन्स सेंटर येथे त्यांनी टाटा समूहाच्या वाटचालीसंदर्भातही त्यांनी माहिती घेतली.



### सांस्कृतिक कार्यक्रमातून भारतीय परंपरेचे दर्शन

मुंबई (दैनिक संध्या) : व्हेनेझुएलाच्या बोलिव्हियन प्रजासत्ताकाच्या कार्यवाहक राष्ट्रपती डेल्सी रॉड्रिग्ज यांचे मुंबईतील ऐतिहासिक ताज महाल पॅलेस हॉटेल येथे आगमन झाले. भारतीय आदरातिथ्याची परंपरा जपत विविध मान्यवरांच्या उपस्थितीत त्यांचे उत्साहपूर्ण स्वागत करण्यात आले. हॉटेलमध्ये आगमनानंतर रॉड्रिग्ज यांचे पारंपरिक पद्धतीने स्वागत करण्यात आले. यावेळी आयोजित करण्यात आलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमाने उपस्थितांचे विशेष लक्ष वेधून घेतले. भारतीय संस्कृती, कला आणि परंपरांचे दर्शन घडविणाऱ्या या कार्यक्रमातून भारताच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाची ओळख करून देण्यात आली. कार्यक्रमादरम्यान भारतीय लोककला, संगीत आणि सांस्कृतिक विविधतेचे आकर्षक सादरीकरण करण्यात आले. व्हेनेझुएलाच्या कार्यवाहक राष्ट्रपतींनी या कार्यक्रमाचे कौतुक करत भारतीय संस्कृतीबद्दल विशेष प्रशंसा व्यक्त केली.

### वार्षिक अहवाल सादर करण्याचे निर्देश : पाटील

मुंबई (दैनिक संध्या) : महाराष्ट्र शासनाच्या ग्रंथालय संचालनालयाने राज्यातील सर्व शासनमान्य सार्वजनिक व ग्रामपंचायत ग्रंथालयांना सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाचे वार्षिक अहवाल लायब्ररी ग्रँट मॅनेजमेंट सिस्टिम (एलजीएमएस) या ऑनलाईन प्रणालीद्वारे सादर करण्याचे निर्देश उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील यांनी दिले आहेत. मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील म्हणाले, उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या १४ जुलै २०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार सार्वजनिक ग्रंथालयांना वार्षिक अहवाल तसेच लेखापरीक्षण अहवाल एलजीएमएस प्रणालीवर अपलोड करणे अनिवार्य करण्यात आले आहे. त्यानुसार चालू वर्षासाठी अहवाल सादर करण्याची प्रक्रिया ३० जून २०२६ पर्यंत सुरू राहणार आहे. राज्यातील सर्व सहाय्यक ग्रंथालय संचालक, जिल्हा ग्रंथालय अधिकारी तसेच शासनमान्य सार्वजनिक व ग्रामपंचायत ग्रंथालयांना या सूचनांचे काटेकोर पालन करण्याचे निर्देश देण्यात आले. जिल्हा ग्रंथालय अधिकाऱ्यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील ग्रंथालयांना आवश्यक मार्गदर्शन करून वार्षिक अहवाल अचूक व वेळेत सादर होतील यासाठी विशेष दक्षता घ्यावी, असे मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील यांनी सांगितले. तसेच, विहित मुदतीत अहवाल सादर न करणाऱ्या किंवा अपूर्ण अथवा चुकीची माहिती सादर करणाऱ्या ग्रंथालयांना अनुदान मंजूर करण्यात येणार नसल्याचा इशाराही मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी दिला आहे. त्यामुळे सर्व संबंधित ग्रंथालयांनी वेळेत माहिती भरून प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.



## वादळग्रस्त भागातील जनजीवन तातडीने पूर्ववत करा : सुनेत्रा अजित पवार

### मुळासकट उन्मळून पडलेल्या झाडांचे पुनर्रोपण करा

■ मुंबई (दै. संध्या)

बारामती शहर आणि परिसरात झालेल्या मान्सूनपूर्व पाऊस व वादळी वाऱ्यामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीची उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी दूरध्वनीद्वारे माहिती घेत तातडीने आवश्यक उपाययोजना करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

वादळी वाऱ्यामुळे बारामती शहरातील अनेक झाडे उन्मळून पडली असून काही झाडांच्या फांद्या तुटल्याने वाहतुकीत अडथळे निर्माण झाले आहेत. या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी बारामती नगर परिषदेचे मुख्याधिकारी पंकज भुसे यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधून सर्व पडलेली झाडे तातडीने हटवून वाहतूक व्यवस्था सुरळीत करण्याचे निर्देश दिले.

यावेळी त्यांनी विशेषतः मुळासकट उन्मळून पडलेल्या मोठ्या वृक्षांचे संवर्धन करण्यावर भर देत, अशा झाडांचे मोठ्या क्रेनच्या सहाय्याने स्थलांतर करून आवश्यक ती छाटणी केल्यानंतर त्यांचे पुनर्रोपण करण्याची कार्यवाही तातडीने हाती घेण्यास सांगितले. तसेच आगामी काळात वादळी वाऱ्याची शक्यता लक्षात घेता रस्त्यालगतच्या मोठ्या वृक्षांची आवश्यक ती छाटणी करून संभाव्य दुर्घटना टाळाव्यात, अशाही सूचना दिल्या.

शहरातील तसेच तालुक्यातील विविध भागांत वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे तात्काळ करून शासनाकडे अहवाल सादर करण्याचे निर्देशही त्यांनी संबंधित यंत्रणांना दिले. बारामती तालुक्यातील नुकसानग्रस्त भागांचा आढावा घेत तहसीलदारांनाही त्वरित पंचनामे करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार या बारामतीतील परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहेत. तसेच प्रशासनाशी सातत्याने संपर्कात असून, नागरिकांचे जनजीवन लवकरात लवकर पूर्ववत करण्यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करण्याचे निर्देश त्यांनी दिले आहेत.

## ग्रंथालय संचालनालयांतर्गत हस्तलिखित सल्लागार समिती गठित

■ उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील

■ मुंबई (दै. संध्या)

महाराष्ट्रातील दुर्मीळ हस्तलिखिते, प्राचीन ग्रंथ आणि ऐतिहासिक दस्तऐवजांचे संवर्धन व जतन अधिक प्रभावीपणे करण्यासाठी हस्तलिखित सल्लागार समिती गठीत करण्यात आली आहे. अशी माहिती उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील यांनी दिली.

मंत्री चंद्रकांत दादा पाटील म्हणाले, राज्यातील सार्वजनिक ग्रंथालय समृद्ध साहित्यिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारशाचे जतन करण्यासाठी ही समिती गठीत करण्यात आली आहे. यामुळे हस्तलिखितांच्या संवर्धनाला चालना मिळाल्यास भावी पिढ्यांसाठी अमूल्य ऐतिहासिक ठेवा सुरक्षित राहण्यास मदत होणार आहे.



महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय अंतर्गत ग्रंथालयांमध्ये जतन करण्यात येणाऱ्या जुन्या व दुर्मीळ पुस्तकांसह हस्तलिखितांच्या संरक्षणासाठी तज्ज्ञ मार्गदर्शन मिळावे या उद्देशाने समिती स्थापन केली असून समितीच्या अध्यक्षपदी ग्रंथालय संचालक यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ही समिती पुढील तीन वर्षांसाठी कार्यरत राहणार आहे.

या समितीमध्ये पद्मश्री डॉ. अच्युत पालव, संशोधक तेजस्विनी सचिन पाठक, भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिराचे डॉ. श्रीनंद लक्ष्मण बापट, इतिहासतज्ज्ञ डॉ. सूरज पंडित तसेच डेक्कन कॉलेजचे प्रा. अभिजित दांडेकर अशा तज्ज्ञांचा समावेश आहे. जिल्हा ग्रंथालय अधिकारी (हस्तलिखित विभाग) हे समितीचे सदस्य सचिव म्हणून काम पाहतील. विविध क्षेत्रांतील हस्तलिखित केलेले जुनी व दुर्मीळ पुस्तके, नियतकालिके व शैक्षणिक दृष्ट्या महत्त्वाची आणि इतर कागदपत्रे शासनास मिळवून देण्यासाठी समिती काम करेल. समितीच्या प्रतिवर्षी किमान दोन बैठका अध्यक्षांच्या अनुमतीने घेण्यात येतील.

### समितीचे कार्य पुढील प्रमाणे असेल

- जुनी व दुर्मीळ पुस्तके, नियतकालिके, हस्तलिखिते व शैक्षणिकदृष्ट्या महत्वाचे असतील असे इतर कागदपत्र शासनास मिळवून देणे.
- खरेदी करावयाच्या हस्तलिखितांची व दुर्मीळ ग्रंथांची योग्य किंमत ठरविणे.
- हस्तलिखित संग्रहालयाच्या अनुषंगिक सर्व बाबी संबधित शासनास सल्ला देणे.
- ही समितीला दरवर्षी किमान दोन बैठका घेणे आवश्यक असून वेळोवेळी अहवाल शासनाकडे सादर करणे आवश्यक आहे.

## 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमात डॉ. श्रीकांत पाटील यांची विशेष मुलाखत

■ मुंबई (दै. संध्या)

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमात महाराष्ट्र राज्य नावीन्यता सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. श्रीकांत पाटील यांची विशेष मुलाखत प्रसारित होणार आहे. 'महाराष्ट्राची स्टार्टअप परिसंस्था, नवोपक्रम आणि उद्योजकतेचा नवा वेग' या विषयावर आधारित या मुलाखतीत राज्याच्या स्टार्टअप धोरणांपासून ते जागतिक स्तरावरील संधींपर्यंत विविध महत्त्वाच्या मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली आहे. 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमात ही मुलाखत दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवरून मंगळवार ९ जून 2026 रोजी रात्री 8.00 वाजता प्रसारित होणार आहे. तसेच महासंचालनालयाच्या अधिकृत समाजमाध्यमातून देखील प्रसारित करण्यात येणार आहे. या मुलाखतीचे निवेदन निवेदिका डॉ.मृण्मयी भाजक यांनी ही मुलाखत घेतली आहे. महाराष्ट्राने राष्ट्रीय स्तरावरील स्टार्टअप इकोसिस्टीम रँकिंगमध्ये 'लीडर्स' श्रेणीत कायम राखलेले अग्रस्थान, राज्याची स्टार्टअप पॉलिसी २०२४-२९, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), डीप टेक, क्लायमेट टेक, ईव्ही आणि ॲग्रीटेक यांसारख्या उदयोन्मुख क्षेत्रांतील संधी आणि तयारी यावर या मुलाखतीत प्रकाश टाकण्यात आला आहे; तसेच ग्रामीण व आदिवासी भागांमध्ये स्टार्टअप संस्कृती रुजवण्यासाठी राबविण्यात येणारे उपक्रम, इन्क्युबेशन सेंटर, सेंटर ऑफ एक्सलन्स, सीड फंडिंग, महिला उद्योजक आणि युवा स्टार्टअप्ससाठीच्या विशेष योजना याबाबतही माहिती देण्यात आली आहे.




## ठाणे क्लस्टर योजनेला गती देण्याचे उपमुख्यमंत्री यांचे निर्देश

■ वागळे इस्टेट, किसननगर, कोपरी क्लस्टर महाप्रीतकडून एमएसआरडीसीकडे देण्याचा निर्णय

■ क्लस्टर प्रकल्पांना गती देण्यासाठी 'व्हायटल पब्लिक हाऊसिंग प्रोजेक्ट' घोषित करणार

■ ठाणे (दै. संध्या)

ठाणे शहरातील धोकादायक इमारतींमधील नागरिकांना तत्काळ दिलासा मिळावा यासाठी क्लस्टर योजनेला गती देण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. कोपरी, किसननगर आणि वागळे इस्टेटमधील क्लस्टर योजना जलदगतीने पूर्ण व्हावी यासाठी ही योजना महाप्रीतकडून एमएसआरडीसीकडे हस्तांतरित करण्याचे निर्देशही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी दिले. ठाणे एमआयडीसीची ६०.७२ हेक्टर जमीन क्लस्टर पुनर्वसन प्रकल्पासाठी लवकर हस्तांतरित करण्याचे निर्देश देतानाच ठाणे जिल्ह्यातील क्लस्टर



प्रकल्पांना गती देण्यासाठी त्यांना 'व्हायटल पब्लिक हाऊसिंग प्रोजेक्ट' घोषित करणार असल्याचे उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्र्यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे ठाणे समूह विकास प्रकल्प आणि एमआयडीसीबाबत आढावा घेतला. ठाणे समूह विकास प्रकल्प आता 'महाप्रीत' ऐवजी एमएसआरडीसीकडून करण्यात येणार असल्याचे सांगत या बदलासाठी आवश्यक असणारी हस्तांतरणाची कायदेशीर प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी, असे निर्देश त्यांनी प्रशासनाला दिले. यावेळी उपमुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव असीम गुप्ता, प्रधान सचिव नवीन सोना, ठाणे महानगरपालिकेचे आयुक्त सौरभ राव, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. वेलारासु आणि सबंधित विभागाचे प्रमुख अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. ठाणे समूह विकास प्रकल्प हा देशातील पहिला भव्य समूह विकास प्रकल्प असल्याचे सांगत उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, ठाणे शहराचा हा समूह विकास प्रकल्प नागरिकांना सुरक्षित आणि हक्काची घरे मिळवून देणारा ठरेल. हा केवळ एक गृहनिर्माण प्रकल्प नसून, नागरिकांचे जीवनमान उंचावणारा समूह विकास प्रकल्प असल्याचे त्यांनी सांगितले. एमआयडीसी क्षेत्रातील ६०.८५ हेक्टर जमीन क्लस्टर योजनेसाठी देण्यास एमआयडीसीने मंजुरी दिली होती. त्याबदल्यात त्यांना १२.५ टक्के विकसित जमीन परत मिळणार होती. मात्र त्यातील काही भूखंडांचे वाटप झाले असल्याने भूखंडधारकांची मंजुरी घेणे, आदिवासी पुनर्वसनासाठी राखीव ७३ भूखंडाचा प्रश्न निकाली काढणे, स्टॉलधारक आणि इतर प्रभावित घटकांना पुनर्वसनाची जबाबदारी निश्चित करण्यासह अन्य विषय प्रलंबित प्रश्न निकाली निघाल्याने उद्योग विभागाची मंजुरी घेऊन येत्या आठवड्याभरात एमआयडीसी आणि टीएमसी यांच्यात त्रिपक्षीय करार पूर्ण करून ही हस्तांतरण प्रकिया वेगाने पूर्ण करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री शिंदे यांनी उद्योग विभागाला दिले. ठाणे शहरातील वागळे इस्टेट, नवी मुंबईतील एमआयडीसी परिसर, कल्याण डोंबिवली क्षेत्रातील एमआयडीसी क्षेत्र आणि वसई विरार एमआयडीसी क्षेत्र या भागांचा पुनर्विकास हा एमआयडीसीच्या माध्यमातून क्लस्टर योजना राबवून करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. मात्र अद्यापही या योजनांना अपेक्षित गती मिळालेली नाही त्यामुळे या क्षेत्रातील धोकादायक इमारतीमध्ये जीव मुठीत धरून राहणाऱ्या लोकांचे पुनर्वसन करण्यासाठी या प्रकल्पांना व्हायटल पब्लिक हाऊसिंग प्रोजेक्ट घोषित करून या प्रकल्पांना गती देण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच ठाणे क्लस्टर योजनेप्रमाणे शासनाला १२.०५ टक्के जमीन देऊन या पुनर्वसन प्रकल्पांना गती देण्यात येणार आहे.

## स्वयंरोजगारासाठी बीज भांडवल योजना

■ मुंबई (दै. संध्या)

तृतीयपंथीय व्यक्तींना आर्थिकदृष्ट्या सक्षम करून त्यांना स्वयंरोजगाराच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी तृतीयपंथीयांच्या स्वयंरोजगार व व्यवसायासाठी बीज भांडवल योजना राबविण्यास मंजुरी देण्यात आली आहे. या योजनेद्वारे २५ हजार रुपयांपासून ते २ लाख रुपयांपर्यंत आर्थिक साहाय्य उपलब्ध करून दिले जाणार आहे. या योजनेचा उद्देश तृतीयपंथीयांना स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासाठी प्रोत्साहन देणे, आर्थिक स्वावलंबन प्राप्त करून देणे, कौशल्य विकासाला चालना देणे तसेच सन्मानाने जीवन जगण्याची संधी उपलब्ध करून देणे हा आहे. यासोबतच सामाजिक आणि आर्थिक सक्षमीकरणालाही या योजनेमुळे बळ मिळणार आहे. योजनेअंतर्गत तीन प्रकारच्या कर्ज योजनांचा समावेश करण्यात आला आहे. लघु कर्ज योजनेत २५ हजार रुपयांपर्यंत, मध्यम कर्ज योजनेत ५० हजार रुपयांपर्यंत तर दीर्घ कर्ज योजनेत २ लाख रुपयांपर्यंत आर्थिक साहाय्य दिले जाणार आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### मका पिकाकरिता वढाणे येथे शेतीशाळा संपन्न

बारामती (दैनिक संध्या) : महाराष्ट्र शासन कृषी विभागाच्या कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा), पुणे अंतर्गत बारामती तालुक्यातील मौजे वढाणे येथे सन २०२६-२७ मधील नैसर्गिक शेती शेतकरी शेतीशाळा (पीक -मका) यांच्या प्रथम वर्गाचे आयोजन करण्यात आले. सदरील शेती शाळेमध्ये शेतकरी निवड, बीज प्रक्रिया, बिजामृत निर्मिती तसेच मका पिकाच्या कॉन्ट्रॅक्ट फार्मिंगविषयी माऊली सहकारी शेतकरी उत्पादक कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी अमित कुतवळ यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी मंडळ कृषी अधिकारी चंद्रकांत मासाळ व उप कृषी अधिकारी प्रशांत मोरे यांनी उपस्थित शेतकरी बांधवांना कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती दिली. कार्यक्रमाची प्रस्तावना आत्माचे सहाय्यक तंत्रज्ञान व्यवस्थापक गणेश जाधव यांनी केली. कार्यक्रमाचे नियोजन तसेच आभार प्रदर्शन सहाय्यक कृषी अधिकारी प्रवीण चांदगुडे यांनी केले. कार्यक्रमास परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### शिवराज्याभिषेक दिनानिमित्त आळंदी नगरपरिषदेच्या वतीने अभिवादन

आळंदी (दैनिक संध्या) : शिवराज्याभिषेक दिनानिमित्त आळंदी नगरपरिषदेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे यांच्या हस्ते हा अभिवादन सोहळा पार पडला. यावेळी नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या विचारांचे स्मरण केले. स्वराज्य स्थापनेसाठी केलेले त्यांचे योगदान आणि लोककल्याणकारी राज्यकारभार आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले. या प्रसंगी मुख्याधिकारी माधव खांडेकर, उपनगराध्यक्षा सुजाता तापकीर, नगरसेवक रामचंद्र भोसले, सागर कुऱ्हाडे, सुरेश झोंबाडे, अनिकेत तापकीर यांच्यासह नगरपरिषदेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. उपस्थितांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.



# ११ जूनला 'संत सोपानकाका शाळा अभियान' पारितोषिक वितरण सोहळा

## पुणे विभागातील ५८ तालुक्यांतील ४,०३२ शाळांचा सहभाग

सासवड (दै. संध्या)

सासवड (ता.पुरंदर) येथील संत सोपानकाका सहकारी बँक व श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थांचे संस्थापक शिक्षणप्रेमी स्व. चंदुकाका जगताप यांच्या जयंतीनिमित्त माजी आमदार संजय जगताप यांच्या संकल्पनेतून सलग चौथ्या वर्षी पुणे विभागातील पाच जिल्हे आणि ५८ तालुक्यांत 'संत सोपानकाका सुंदर माझी शाळा' अभियान राबविण्यात आले आहे. या अभियानाचा जिल्हा व तालुकास्तरीय पारितोषिक वितरण समारंभ गुरुवारी (ता. ११) सकाळी १०:३० वाजता सासवड येथील आचार्य अत्रे सांस्कृतिक भवनात आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती संयोजन समितीचे प्राचार्य नंदकुमार सागर यांनी पत्रकार परिषदेत दिली. या अभियानांतर्गत सन २०२५-२०२६ या शैक्षणिक वर्षामध्ये पुणे, सोलापूर, सातारा, सांगली आणि कोल्हापूर या पाच जिल्ह्यांतील एकूण ४,०३२ माध्यमिक विद्यालयांची पाहणी करण्यात आली. आरोग्य व स्वच्छता, पर्यावरण, गुणवत्ता आणि भौतिक सुविधा आदी निकषांवर ही तपासणी करून विजेत्या शाळांची निवड करण्यात आली आहे. यामध्ये विभागातून पाच उपक्रमशील शाळांचा विशेष गौरव करण्यात येणार आहे. प्रत्येक जिल्ह्यात प्रथम तीन क्रमांकांना अनुक्रमे १० हजार, सात हजार, पाच हजार रुपये रोख, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, पुस्तक व शाल-श्रीफळ दिले जाणार आहे. तर ५८ तालुक्यांतील पहिल्या तीन क्रमांकांना अनुक्रमे तीन, दोन व एक हजार रुपये रोख व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात येणार आहे.

भाजपाचे प्रदेशाध्यक्ष आमदार रविंद्र चव्हाण, शालेय शिक्षणमंत्री पंकज भोयर यांच्या उपस्थितीत आणि माजी आमदार संजय जगताप यांच्या अध्यक्षतेखाली हा सोहळा संपन्न होणार आहे. याशिवाय सासवडच्या नगराध्यक्षा आनंदीकाकी जगताप, सनदी अधिकारी डॉ. राजेंद्र जगताप, शिक्षणाधिकारी डॉ. भाऊसाहेब कारेकर, प्राचार्य डॉ. निवेदिता गजानन एकबोटे, संत सोपानकाका सहकारी बँकेचे अध्यक्ष रमणिकलाल कोठडिया, विलास किरवे, गणपतराव बालवडकर, प्रदीप वळसे पाटील, चंद्रकांत पाटील,



दादा लाड, बंडोपंत कुलकर्णी, दशरथ सगरे, सुभाष माने, तसेच पाचही जिल्ह्यांचे जिल्हाध्यक्ष प्रसाद गायकवाड (पुणे), तानाजी माने (सोलापूर), चंद्रकांत जाधव (सातारा), संजयकुमार झांबरे (सांगली) आणि राहुल पवार आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या पत्रकार परिषदेला संत सोपानकाका फाउंडेशनचे प्रकाश पवार, अभियान समितीचे प्राचार्य नंदकुमार सागर, मुख्याध्यापक सुधाकर जगदाळे, कुंडलिक मेमाणे, दत्तात्रय रोकडे, तानाजी झेंडे, अनिल उरवणे, रवींद्रपंत जगताप, रामप्रभू पेटकर, सतिश शिंदे, राजेंद्र जाधव उपस्थित होते. वसंतराव ताकवले यांनी आभार मानले.

जिल्हानिहाय प्रथम तीन क्रमांकांच्या शाळा अनुक्रमे पुढीलप्रमाणे : पुणे जिल्हा : श्री म्हातोबा बालवडकर विद्यालय बालेवाडी. मॉर्डन हायस्कूल पुणे. पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालय व दत्तात्रय गोविंदराव वळसे पाटील माध्यमिक विद्यालय निरगुडसर, ता. आंबेगाव.

उपक्रमशील शाळा : कै. रामराव पलांडे माध्यमिक आश्रमशाळा मुखई, ता. शिरूर.

सांगली जिल्हा : न्यू इंग्लिश स्कूल कसबे डिग्रज, ता. मिरज. न्यू इंग्लिश स्कूल मुचंडी, ता. जत. महात्मा गांधी विद्यालय विटा, ता. खानापूर.

उपक्रमशील शाळा : प्रतिनिधी हायस्कूल कुंडल, ता. पलूस.

सोलापूर जिल्हा : श्री दत्त प्रशाला मोहोळ रेल्वे स्टेशन कोळेगाव, ता. मोहोळ. विद्यामंदिर हायस्कूल वाकी, ता. सांगोला. संभाजीराव चव्हाण माध्यमिक विद्यालय विठ्ठलवाडी, ता. माढा.

उपक्रमशील शाळा : वामनराव माने प्रशाला भैरवनाथवाडी, ता. पंढरपूर.

कोल्हापूर जिल्हा : प. बा. पाटील हायस्कूल बिंद्री, ता. कागल. आदर्श प्रशाला कोल्हापूर. जागृती हायस्कूल गडहिंग्लज.

उपक्रमशील शाळा : दी न्यू एज्युकेशन सोसायटीचे प्रिंसेस पद्माराजे गर्ल्स हायस्कूल कोल्हापूर.

सातारा जिल्हा : यशवंत हायस्कूल कराड. श्रीमंत सगुणामाता विद्यालय दालवडी, ता. फलटण. श्री वाल्मिकी विद्यालय तळमावले, ता. ता. पाटण.

उपक्रमशील शाळा : मुधाईदेवी विद्यामंदिर देऊर, ता. कोरेगाव.

# गायींच्या मोठ्या आवकेने आळेफाटा बाजार गजबजला

नारायणगाव (दै. संध्या)

आळेफाटा येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात गुरुवारी भरलेल्या साप्ताहिक पशुधन बाजारात गायींची विक्रमी आवक झाल्याने बाजार परिसरात मोठी गर्दी पाहायला मिळाली. जुन्नर, आंबेगाव, खेड, शिरूर, पुणे आणि नगर जिल्ह्यासह विविध भागांतून पशुपालक मोठ्या संख्येने बाजारात दाखल झाले होते.

दूधाळ गायींच्या खरेदी-विक्रीसाठी शेतकरी, व्यापारी आणि ग्राहकांनी मोठी उपस्थिती लावली. विविध जातींच्या गायींना चांगली मागणी असल्याने व्यवहारांना वेग आला. गायींची किंमत, दूध उत्पादन क्षमता आणि आरोग्य यांची पाहणी करून खरेदीदारांनी मोठ्या प्रमाणावर व्यवहार केले.

बाजारात झालेल्या विक्रमी आवकेमुळे परिसरातील व्यापार, वाहतूक आणि इतर व्यवसायांनाही चालना मिळाली. पशुधन बाजारामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला बळकटी मिळत असून बाजार समितीने व्यापारी आणि पशुपालकांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.

बाजार समितीच्या अधिकाऱ्यांनी पशुपालकांना योग्य मार्गदर्शन करत बाजाराचे नियोजन सुरळीतपणे केले.



बाजार समितीचे सचिव रुपेश कवडे आणि सतीश मस्करे यांनी यावेळी गाईंची मोठ्या प्रमाणात आवक झाल्याची माहिती दिली. बाजार समितीचे सभापती संजय काळे यांच्या मार्गदर्शनाखाली बाजाराचे नियोजन करण्यात आले होते. गायींच्या मोठ्या आवकेमुळे बाजारात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाला थेट उच्च शिक्षणमंत्र्यांचेच आव्हान

पुणे (दै. संध्या)

देश महासत्ता व्हायचं असेल, देशातील गरिबी नष्ट करायची असेल, तर अधिकाधिक संशोधन होणे गरजेचे आहे. त्यातही दर्जेदार व समाजोपयोगी विषय, प्रश्नांवर संशोधन झाले पाहिजे. याद्दष्टीने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने नेमके काय भरीव काम केले? हा मला पडलेला प्रश्न आहे.

केलेही असेल, तर मला त्याबद्दल माहिती नाही, अशा शब्दांत उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठांच्या कामगिरीवर शंका उपस्थित केली. दस्तुरखुद्द उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनीच एक प्रकारे विद्यापीठ प्रशासनाला खुलं आव्हान दिलं असून, प्रशासन आणि संशोधक ते स्वीकारणार का? हा खरा प्रश्न आहे. डीईएस पुणे विद्यापीठात 'स्कूल ऑफ सायन्स अँड मॅथेमटिक्स'च्या नवीन इमारत व संशोधन केंद्राच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

आम्ही नावीन्यपूर्ण संशोधन केले, असा दावा राज्यातील एकही विद्यापीठ करीत नाही. आयआयटी रोज नवे संशोधन करीत असून, समाजाला काहीतरी देत आहे. मात्र, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने कोणते भरीव काम केले, अशा शब्दांत उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी विद्यापीठांच्या कामगिरीबाबत शुक्रवारी (दि. ५) तीव्र नाराजी व्यक्त केली.

देशाला आर्थिक महासत्ता बनवायचे असल्यास संशोधन, उत्तम प्रशिक्षण आणि आपण कशासाठी काम करीत आहोत याची स्पष्ट दिशा या तीन बाबी महत्वाच्या आहेत. त्यावर विशेष भर द्यावा लागेल. याद्दष्टीने डीईएस पुणे विद्यापीठाने संशोधनाला केंद्रस्थानी ठेवून वाटचाल सुरू केली आहे. समाजाभिमुख प्रकल्पांना विशेष प्राधान्य दिले आहे.

### सहकार्य करण्यास सरकार तयार

देशाला आर्थिक महासत्ता बनवायचे असल्यास संशोधन, उत्तम प्रशिक्षण आणि आपण कशासाठी काम करीत आहोत याची स्पष्ट दिशा या तीन बाबी महत्वाच्या आहेत. त्यावर विशेष भर द्यावा लागेल. याद्दष्टीने डीईएस पुणे विद्यापीठाने संशोधनाला केंद्रस्थानी ठेवून वाटचाल सुरू केली आहे. समाजाभिमुख प्रकल्पांना विशेष प्राधान्य दिले आहे. अशा वेळी संशोधनाला अधिक बळ देण्यासाठी, विद्यापीठे आणि महाविद्यालयांमधील संशोधन प्रकल्पांना प्रभावी मार्गदर्शन मिळण्याच्या द्दष्टीने राज्य सरकार सहकार्य करण्यास तयार आहे, असेही पाटील म्हणाले.

# एसएसपीएमएस येथील छत्रपती शिवरायांच्या अश्वारुढ स्मारकासमोर उभारणार भगव्या स्वराज्यध्वजासह ५१ फुट शिवशक राजदंड स्वराज्यगुढी

पुणे (दै. संध्या)

शिवरायांनी स्वत:चा शक म्हणजेच शिवशक प्रारंभ करुन राजदंड हाती घेत सर्व प्रस्थापित सत्ता पालथ्या करुन स्वराज्याचा सार्वभौम पवित्र सुवर्ण कलश रयतेच्या झोळी मध्ये रिता करुन रयतेची झोळी सुख समृद्धी, स्वातंत्र्य, समानतेने भरली. त्यामुळे शिवराज्याभिषेक तथा शिवस्वराज्य दिना निमित्त शनिवार, दिनांक ६ जून रोजी सकाळी १० वाजता शिवाजीनगर येथील एसएसपीएमएस येथील छत्रपती शिवाजी महाराजांचे जगातील पहिले पूर्णाकृती भव्य अश्वारुढ स्मारक व शिवराज्याभिषेक शिल्पासमोर भगव्या स्वराज्यध्वजासह शिवशक राजदंड स्वराज्यगुढी उभारण्यात येणार आहे, यावेळी शिवकालीन ऐतिहासिक सर्व स्वराज्यघराणी, स्वराज्यबांधव व महिलावर्ग उपस्थित राहणार आहेत. अशी माहिती शिवस्वराज्य दिन सोहळ्याचे प्रवर्तक व शिवजयंती महोत्सव समितीचे आद्यप्रवर्तक संस्थापक अध्यक्ष अमित गायकवाड यांनी दिली.

पुण्यामध्ये दरवर्षी लालमहाल, एसएसपीएमएस येथील छत्रपती शिवाजी महाराज स्मारक, छत्रपती संभाजी महाराज स्मारक डेक्कन, शनिवारवाडा यांसह अनेक ठिकाणी स्वराज्य गुढी उभारली जाते. यावर्षी देखील एसएसपीएमएस येथील छत्रपती शिवाजी महाराज स्मारक येथे स्वराज्यगुढी उभारुन पूजन होणार आहे.

अमित गायकवाड म्हणाले, शिवराज्याभिषेक दिन म्हणजेच ६ जून १६७४ हा दिवस भारताच्या इतिहासाला कलाटणी देणारा अतिशय महत्वाचा दिवस आहे. त्यामुळेच ६ जून विश्वव्यापी होण्यासाठी आम्ही ६ जून २०१३ साला पासून हा दिवस "शिवस्वराज्य दिन" म्हणून भगव्या स्वराज्यध्वजासह शिवशक राजदंड स्वराज्यगुढी प्रत्येक गडावर, घरावर, चौकात, गावात, तालुक्यात, शहरात, जिल्ह्यात, राज्यात तसेच देशविदेशात उभारुन साजरा करत असताना या दिवसाला महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास मंत्रालय तसेच उच्च व तंत्र शिक्षण मंत्रालयाची मान्यता घेऊन शिवस्वराज्य दिन महाराष्ट्र व्यापी बनवला. २०२१ सालापासुन अमित गायकवाड यांच्या संकल्पनेतून ग्रामविकास खात्याने तसेच उच्च व तंत्र खात्याने शासकीय परिपत्रक काढून महाराष्ट्रातील ३३ जिल्हा परिषदा, ३५१ पंचायत समित्या आणि सुमारे ४३,००० गावांत त्याचबरोबरीने महाराष्ट्रातील सर्व अकृषीक, अभिमत, स्वयंअर्थसाहाय्यिक विद्यापीठ, महाविद्यालये, अभियांत्रिकी महाविद्यालये, तंत्र निकेतने आणि तत्सम शिक्षण संस्थामंध्ये ६ जून हा दिवस "सार्वजनिक शिवस्वराज्य दिन" स्वराज्यगुढी उभारुन साजरा करण्यास सुरुवात केली.



आता प्रत्येक गडावर, घरावर, चौकात, गावात, तालुक्यात, जिल्ह्यात, शहरात, महाविद्यालयात, राज्यात तसेच देशविदेशात "सार्वजनिक शिवस्वराज्य दिन" स्वराज्यगुढी उभारुन साजरा केला जात आहे. शिवरायांचा जिरेटोप, सुवर्णहोन, जगदंब तलवार, वाघनखे, शिवमुद्रा या पंचशुभ चिन्हांनी अलंकृत भगवा स्वराज्यध्वज निर्माण करण्यात आला आहे. यावर्षी देखील विविध ठिकाणी स्वराज्यध्वज व स्वराज्यगुढी उभारुन शिवराज्याभिषेक दिन तथा शिवस्वराज्य दिन साजरा होणार आहे.

समितीच्या आवाहनाला प्रतिसाद देत श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती, तुळशीबाग मंडळ, सेवा मित्र मंडळ, साईनाथ मंडळ, लक्ष्मीबाई दत्त मंदिर यासह ३६० गणेशोत्सव मंडळे तसेच शिवकालीन सरदारांच्या वंशजांकडून शिवनेरी, राजगड, तोरणा, पुरंदर, सिंहगड, संग्रामदुर्ग यासह असंख्य किल्ल्यावर शिवशक राजदंड स्वराज्य गुढी उभारुन साजरा होतो, असेही त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे आयोजन सोहळयाचे प्रवर्तक अमित गायकवाड, सचिन पायगुडे, रवींद्र कंक, समीर जाधवराव, निलेश जेधे, शंकर कडू, किरण साळी, प्रवीण गायकवाड, गोपी पवार, सागर पवार,मोहन पासलकर, किरण शितोळे, महेंद्र भोईटे यांसह असंख्य स्वराज बांधवांनी केले आहे.

## 'हिंदू इकॉनॉमिक फोरम पुणेच्या 'शक्ती समिट २०२६' मध्ये

# ५०० दशलक्ष डॉलर्सचा एआय रोडमॅप जाहीर

## कोट्यवधींचे सामंजस्य करार आणि स्टार्टअप्समध्ये गुंतवणूक

पुणे (दै. संध्या)

'विकसित भारत २०४७' च्या दिशेने देशाच्या घोडदौडीला गती देत, 'हिंदू इकॉनॉमिक फोरम'च्या (एचईएफ) पुणे शाखेतर्फे आयोजित 'शक्ती समिट २०२६' चा पुणे आंतरराष्ट्रीय केंद्रात यशस्वी समारोप झाला. ही उच्चस्तरीय परिषद भारताच्या धोरणात्मक शक्ती आराखड्यासाठी एक महत्त्वपूर्ण व्यासपीठ ठरले आहे.

यामध्ये धोरणात्मक संरक्षण आणि एरोस्पेस, हिंदू मंदिर अर्थव्यवस्था, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, ज्ञान आणि प्रसारमाध्यमे ), तंत्रज्ञान आणि पायाभूत सुविधा या मुख्य क्षेत्रांचा प्रामुख्याने समावेश होता.या परिषदेने आपल्या बहुआयामी उद्दिष्टांची यशस्वी पूर्तता केली. यामध्ये प्रामुख्याने स्वदेशी 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स'ला भक्कम आधार देणे, देशांतर्गत व्हेंचर कॅपिटलचा मार्ग मोकळा करणे आणि महत्त्वपूर्ण संरक्षण व आर्थिक व्यवस्थेमध्ये धोरणात्मक आत्मनिर्भरतेला बळ देणे या मुद्द्यांवर विशेष भर देण्यात आला. महाराष्ट्राचे माननीय राज्यपाल श्री. जिष्णू देव वर्मा यांनी या कार्यक्रमाला मुख्य अतिथी म्हणून उपस्थित राहून विशेष मार्गदर्शन केले.

भारताचा दीर्घकालीन विकास आणि धोरणात्मक आत्मनिर्भरतेसाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या क्षेत्रांमध्ये सरकार, उद्योग जगत, गुंतवणूकदार आणि शैक्षणिक-संशोधन संस्था यांच्यात अधिक भक्कम समन्वय व सहकार्य असण्याच्या गरजेवर त्यांनी आपल्या भाषणात विशेष भर दिला. राज्यपाल श्री. जिष्णू देव वर्मा यांनी नमूद केले की, 'शक्ती समिट २०२६' हे एका आत्मविश्वासी, आत्मनिर्भर आणि जागतिक स्तरावर सक्षम भारताच्या आकांक्षांचे प्रतिनिधित्व करते. बदलती भू-राजकीय परिस्थिती आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानामुळे उद्योगांना मिळणारे नवीन स्वरूप पाहता, भारताकडे नाविन्यपूर्ण संशोधन, उद्योजकता आणि धोरणात्मक भागीदारीच्या माध्यमातून विविध महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये आपले स्थान बळकट करण्याची मोठी संधी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

उद्योग जगत, शैक्षणिक संस्था, गुंतवणूकदार, स्टार्टअप्स आणि एमएसएमई यांच्यात अधिक जवळचे संबंध असण्याच्या गरजेवर भर देताना राज्यपाल म्हणाले की, महाराष्ट्रात आणि विशेषतः पुण्यात भारताच्या विकासाच्या पुढील टप्प्याला गती देण्यासाठी आवश्यक असलेली प्रतिभा, पायाभूत सुविधा आणि संस्थात्मक ताकद उपलब्ध आहे. 'विकसित भारत २०४७' चे स्वप्न केवळ सर्वसमावेशक, शाश्वत आणि समाजातील प्रत्येक घटकाला फायदेशीर ठरेल अशा विकासाच्या माध्यमातूनच पूर्ण केले जाऊ शकते, असेही त्यांनी शेवटी जोडले.




एचईएफ पुणे जिल्हा शाखेचे अध्यक्ष आणि 'पार्टेक्स.एआय'चे सह-संस्थापक व सीटीओ गौरव त्रिपाठी म्हणाले की, 'शक्ती समिट २०२६' मुळे आर्थिक विकासाकडे पाहण्याच्या आपल्या द्दष्टिकोनात मोठा बदल झाला आहे. आम्ही आता अशा एका 'एक्झिक्युशन-फर्स्ट' (अमलबजावणीला प्राधान्य देणाऱ्या) व्यवस्थेची निर्मिती करत आहोत, जिथे मोठा भांडवलशाही निधी, धोरणात्मक औद्योगिक क्षेत्रे आणि सांस्कृतिक-सभ्यताविषयक स्पष्टता यांचा मिलाफ होत आहे.

